बी.एम. प्रतिष्ठान
बी. एम. प्रतिष्ठान
महाराष्ट्र राज्य
संस्थापक अध्यक्ष
बाळासाहेब भगवानराव मस्के

दैनिक बीड
# पुण्यभूमी
संपादक:बाळासाहेब मस्के

### नीरज चोप्रा इतिहास घडवण्यासाठी सज्ज

दिल्ली:पॅरिस ऑलिम्पिक २०२४ स्पर्धेत भारताने आतापर्यंत फक्त ३ पदके जिंकली आहेत आणि तिन्ही पदके नेमबाजीत जिंकली आहेत. याशिवाय अजून एकही पदक मिळालेले नाही. पण टीम इंडियाला पॅरिस ऑलिम्पिकच्या १३व्या दिवशी आणखी पदके मिळू शकतात. भारताचा स्टार थलीट नीरज चोप्रा भालाफेकीच्या अंतिम सामन्यासाठी मैदानात उतरणार आहे. भारतीय हॉकी संघाचा कांस्यपदकासाठी सामना होणार आहे. यासोबतच कुस्ती आणि थलेटिक्समध्येही काही महत्त्वाचे सामने होणार आहेत.

बीड | शुक्रवार,दि.९ऑगस्ट २०२४ | वर्षे४रे | अंक११वा | पाने ६ | दररोजच्या घडामोडीसाठी वाचत रहा... पुण्यभूमी | https://Paper.epunyabhumi.in | RNI No : MAHAMAR/2021/81902 | ₹ ३

# भाजपा म्हणजे 'भारतीय जमीन पार्टी'

## लोकसभेत : वक्फ बिलावरुन अखिलेश यादवांची टीका

दिल्ली/पुण्यभूमी प्रतिनिधी

केंद्र सरकारने आज लोकसभेत वक्फ कायदा सुधारणा विधेयक सादर केले. त्यानंतर इंडिया आघाडीकडून या विधेयकावर जोरदार टीका करण्यात येत आहे. समाजवादी पक्षाचे प्रमुख अखिलेश यादव यांनीही या विधेयकाचा विरोध केला. ते म्हणाले की, भाजपाला वक्फ बोर्डाची जमीन विकायची आहे. भाजपाचा आता भारतीय जनता पार्टी राहिली नसूनती भारतीय जमीन पार्टी झाली आहे.अखिलेश यादव यांनी एक्सवर सविस्तर पोस्ट टाकत या विधेयकावर टीका केली. ते म्हणाले, वक्फ बोर्डाच्या कायद्यात सुधारणा करणे, ही केवळ एक दिशाभूल आहे. खरंतर संरक्षण, रेल्वे आणि नजूल जमिनींना यामाध्यमातून विकण्याचा घाट घातला जात आहे. संरक्षण, रेल्वे आणि नजूल जमिनीनंतर आता वक्फ बोर्डाच्या जमिनीवरही भाजपाचा डोळा आहे. भाजपाने या विधेयकावर लिहावे की, भाजपाच्या हितार्थ सादर करत आहोत.भाजपा वक्फ बोर्डाची जमीन विकणार नाही, याचे लेखी आश्वासन द्यावे. भाजपा आता एखाद्या रिअल इस्टेट कंपनीप्रमाणे काम करत आहे. भाजपाने आता आपल्या नावातील जनताच्या जागी जमीन लिहून 'भारतीय जमीन पार्टी' नामकरण करावे, अशीही टीका अखिलेश यादव यांनी केली.दरम्यान कालच काँग्रेसचे लोकसभेतील खासदार केसी वेणूगोपाळ यांनी 'वक्फ (सुधारणा) कायदा, २०२४' या विधेयकाच्या विरोधात पत्र दिले होते. तर समाजवादी पक्षानेही लोकसभेत या विधेयकाचा विरोध केला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील केंद्र सरकार 'वक्फ बोर्ड अधिनियम- १९९५' या कायद्यात सुधारणा करण्यासाठी संसदेत विधेयक सादर केले. नुकत्याच झालेल्या केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीत ४० सुधारणांवर चर्चा करून या प्रस्तावाला मंजुरी देण्यात आली होती. या सुधारित विधेयकाला अनेक विरोधी पक्षांनी आणि काही संघटनांनी विरोध दर्शविला आहे.


### वक्फ कायदा काय आहे?

वक्फचे नियमन करणारा पहिला कायदा ब्रिटिश राजवटीत १९२३ मध्ये लागू करण्यात आला. त्याला 'मुसलमान वक्फ कायदा-१९२३' असे नाव देण्यात आले. स्वतंत्र भारतात १९५४ मध्ये प्रथम वक्फ कायदा करण्यात आला. त्या वेळी केंद्रीय वक्फ परिषदेची स्थापना करण्यात आली. त्या वेळी वक्फ बोर्डाचे अधिकार मर्यादित होते. मात्र १९९५मध्ये नरसिंह राव सरकारने १९५४ चा कायदा रद्द करत नवीन वक्फ कायदा मंजूर करण्यात आला, ज्याने वक्फ बोर्डाला व्यापक अधिकार दिले. वक्फ बोर्ड अधिनियम-१९९५ नुसार जर एखादी संपत्ती कोणत्याही उद्देशाशिवाय पवित्र, धार्मिक मानली गेली, तर ती वक्फची संपत्ती असते. वक्फ बोर्डाने कोणत्याही जमीन किंवा मालमत्तेवर हक्क सांगितल्यास ती जमीन मालकाने द्यावी लागते. त्याविरोधात तो न्यायालयाचे दरवाजे ठोठावू शकत नाही.



## हॉकी संघाने सलग दुसऱ्यांदा कोरलं नाव

### क्रीडांगण : श्रीजेशच्या कारकीर्दीचा गोड शेवट




दिल्ली/पुण्यभूमी प्रतिनिधी

भारताच्या हॉकी संघाने पॅरिस ऑलिम्पिकमध्ये कांस्यपदक जिंकत यंदाच्या ऑलिम्पिकमधील भारताला चौथ पदक मिळवून दिलं आहे. भारताने कांस्यपदकाच्या सामन्यात स्पेनचा २-१ अशा फरकाने पराभव करत १४ वं ऑलिम्पिक पदक हॉकी संघाने पटकावलं आहे. या विजयासह पॅरिस ऑलिम्पिकमध्ये भारतीय हॉकी संघाने इतिहास घडवला आहे. संघाने सलग दुसऱ्यांदा कांस्यपदक जिंकले आहे. याआधी त्यांनी टोकियो ऑलिम्पिकमध्येही कांस्यपदक जिंकले होते. भारतीय हॉकी संघाच्या इतिहासात ही दुसरी वेळ आहे, जेव्हा भारताने सलग दोनदा ऑलिम्पिकमध्ये कांस्यपदक जिंकले आहे. यापूर्वी १९६८ आणि १९७२ च्या ऑलिम्पिकमध्येही भारताने कांस्यपदक जिंकले होते. भारताचा गोलकिपर म्हणजेच भारतीय हॉकी संघाची भिंत म्हटल्या जाणाऱ्या श्रीजेशचा हा अखेरचा आंतरराष्ट्रीय सामना होता, कांस्यपदकाला गवसणी घालत श्रीजेशच्या कारकीर्दीचा गोड शेवट झाला आहे.पॅरिस ऑलिम्पिक २०२४ चा कांस्यपदकासाठी भारत वि स्पेन यांच्यात हॉकी सामना खेळवला गेला. पहिल्या क्वार्टरमध्ये दोन्ही संघांनी गोल करण्याचा प्रयत्न केला. पण कोणताच संघ गोल करू शकला नाही. त्यानंतर दुसऱ्या क्वार्टरमध्ये स्पेनला पेनल्टी मिळाली आणि त्यांनी गोल करत आघाडी मिळवली. यानंतर ३०व्या मिनिटाला भारताला पेनल्टी मिळाली आणि यानंतर कर्णधार

पान २ वर...

## रस्ते दुरुस्तीच्या कामात हयगय नको

### तत्परता : मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंच्या अधिकाऱ्यांना सूचना

मुंबई/पुण्यभूमी प्रतिनिधी

नाशिक, मुंबई-अहमदाबाद महामार्गावरील खड्ड्यांची तातडीने दुरुस्ती करण्यासाठी रॅपीड क्वीक हार्डनर, एम सिक्टी तंत्रज्ञानाचा वापर करण्यात येत असून त्याचे काम प्रगतीपथावर आहे. तातडीने हे काम पूर्ण करून नागरिकांना वाहतूक कोंडीतून दिलासा देण्याचे निर्देश मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी राष्ट्रीय महामार्ग, एमएसआरडी, सार्वजनिक बांधकाम, वाहतूक पोलीस विभागाच्या अधिकाऱ्यांना दिले.नाशिक-भिवंडी रस्त्याच्या तातडीने दुरुस्तीसाठी युद्ध पातळीवर काम करण्याच्या सूचना देतानाच रस्ते दुरूस्तीच्या कामात हयगय करू नका. पीक अवरमध्ये अवजड वाहतुकीच्या नियमांसाठी कोकण विभागीय आयुक्तांनी एकत्रित अधिसूचना काढावी, अवजड वाहनांसाठी महामार्गालगत पार्कींग लॉट करावे, असे निर्देश मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिले आहेत.मुख्यमंत्री शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली आज सह्याद्री अतिथीगृह येथे ठाणे, पालघर, नाशिक, रायगड जिल्ह्यातील महामार्गावरील वाहतूक कोंडी, आगामी गणेशोत्सव कालावधीतील वाहतुकीच्या नियोजनाबाबत चर्चा झाली. यावेळी अपर मुख्य सचिव डॉ.आय. एस.चहल,



पान २ वर...

### वाढदिवस ...




**परळी :** औष्णिक विद्युत केंद्राचे उपमुख्य अभियंता अमित बनकर यांचा वाढदिवसानिमित्त सत्कार करतांना,अधीक्षक अभियंता प्रसन्न कुमार गरुड, डी डी कोकाटे ,अरविंद येरणे ,विलास ताटे ,बी.आर.अंबड, भगवान साकसमुद्रे,ओमकार कुलकर्णी आदि.

## निवडणुक तोंडावर ऐरंडाच गुऱ्हाळ?

### सवाल : मतदारांना भुलथापा मारायच्या बंद कराव्यात

केज/पुण्यभूमी प्रतिनिधी

मतदार संघाच्या विद्यमान आमदार मुंदडा घराण्याने जनतेला निवडणूक तोंडावर आली की थापा मारण्याशिवाय दुसरं काही आज पर्यंत मतदार संघात केले नाही .अंबाजोगाईत साखर कारखाना आणला रजिस्ट्रेशन झालं म्हणून गाजावाजा केला त्यांचे काय झाले काहीच नाही नंतर अंबाजोगाई जिल्हा करतो म्हणून गाजावाजा केला निवडणुक झाली नंतर नामोनिशाण सुध्दा कुठे काढले नाही पंचतारांकित एमआयडीसी वरवटी या ठिकाणी आणली होती कुणी अडवली, शेतकऱ्याचे नावे सांगून बनवाबनवी चे काम मुंदडा कुटुंबाने निवडणूक तोंडावर करीत आहे बेरोजगारांना रोजगार मिळेल अशी कोणतेही युनिट मुंदडा कुटुंबाने वीस ते पंचवीस वर्षे झाले मतदार संघात उपलब्ध केले नाही आणले नाही, मतदार संघात हा विकास करु तो विकास करु अशा बातम्या छापून जनतेमध्ये संभ्रम मतदारांमध्ये निर्माण करण्याचा राजस्थानी शेठजी हा जुना धंदा स्वर्गीय मुंडे साहेबांचे माझं जमत नाही म्हणून बनसारोळा या ठिकाणी मागील काळात राजस्थानी शेठजीनी स्वर्गीय मुंडे साहेबांना काळे झेंडे दाखवले होते ,मला विकास करू देत नाही म्हणून शरद पवार साहेब यांच्या राष्ट्रवादीमध्ये प्रवेश केला हे राजस्थानी शेठजी मतदारांना भुलथापा मारून भावनीक करतात तसेच त्यांनी राष्ट्रवादीमध्ये जाऊन कोणता प्रकल्प मतदार संघात या ठिकाणी



पान २ वर...

## ईडीचा संचालक लाच घेताना पकडला

### खळबळ : सीबीआयची मोठी कारवाई

दिल्ली/पुण्यभूमी प्रतिनिधी

गेल्या काही वर्षात देशभरातील सीबीआय आणि ईडीची कारवाई हा विषय चांगलाच चर्चेत राहिला आहे. सीबीआय आणि ईडीच्या कारवाईसंदर्भात अनेकदा सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये आरोप-प्रत्यारोपही पाहायला मिळाले. मात्र, आता केंद्रीय अन्वेषण ब्युरो अर्थात सीबीआयने ईडीच्या सहाय्यक संचालकालाच लाचखोरीच्या प्रकरणात अटक केल्याची माहिती समोर आली आहे. राजधानी दिल्लीत तब्बल २० लाखांची लाच घेताना अंमलबजावणी संचालनालयाच्या (ईडी) सहाय्यक संचालकाला अटक करण्यात आली आहे. ईडीच्या सहाय्यक संचालकाला लाच घेताना अटक करत सीबीआयने मोठी कारवाई केली. संदीप सिंह यादव असं अटक करण्यात आलेल्या ईडी अधिकाऱ्याचं नाव असल्याची माहिती मिळत आहे. दिल्लीतील लाजपत नगर परिसरात ही कारवाई करण्यात आली. मात्र, ईडीचा सहाय्यक संचालकच लाच घेताना पकडल्यामुळे दिल्लीत मोठी खळबळ उडाली आहे. दरम्यान, यासंदर्भातील वृत्त एनडीटीव्हीने दिलं आहे.




पान २ वर...

### मनोज जरांगे | महायुती सरकारने मराठ्यांना फसविले

## वाटोळे करायचे हीच सरकारची पद्धत

सोलापूर/पुण्यभूमी प्रतिनिधी

राज्यातील महायुती सरकारने मराठ्यांसह धनगर समाजालाही फसविले आहे. एका हाताने देऊन मतांचे राजकारण करायचे आणि सत्ता संपादन केल्यानंतर दुसऱ्या हाताने वाटोळे करायचे. वाटोळे करणारे तेच आणि नंतर समजावून सांगणारेही तेच, अशी महायुती सरकारची फसवी पद्धत आहे. त्याचे सूत्रधार देवेंद्र फडणवीस हेच आहेत, असा आरोप मराठा आरक्षण आंदोलनाचे नेते मनोज जरांगे-पाटील यांनी केला आहे. मराठा आरक्षण प्रश्नावर जरांगे-पाटील यांनी दुसऱ्या टप्प्यातील शांतता संवाद यात्रेची सुरुवात सोलापुरातून केली. रात्रीच्या मुक्कामानंतर दुसऱ्या दिवशी सांगलीकडे रवाना होण्यापूर्वी त्यांनी प्रसारमाध्यमांशी संवाद साधला. त्या वेळी त्यांनी पुन्हा एकदा उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अन्न व नागरी पुरवठामंत्री छगन भुजबळ यांच्या विरोधात संताप व्यक्त केला.मराठा आरक्षण आंदोलनात शरद पवार, उद्धव ठाकरे आणि मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या विषयी कोणतेही टीकात्मक भाष्य न करता केवळ देवेंद्र फडणवीस आणि छगन भुजबळ यांच्यावर तुटून पडता, या प्रश्नावर जरांगे-पाटील म्हणाले, की मराठा समाजाचे कोणी वाटोळे केले, हे या समाजाला चांगलेच ठाऊक आहे. म्हणून तर आम्ही राज्यात सत्तांतर घडवून भाजपला निवडून दिले होते. शरद पवार, उद्धव ठाकरे आणि एकनाथ शिंदे यांच्याबाबत आपण काय बोललो, हे समाजमाध्यमांमध्ये आजही पाहायला मिळेल. शासनाने आरक्षण प्रश्नावर १३ तारखेपर्यंत मुदत मागितल्यामुळे मुख्यमंत्री शिंदे यांच्याबद्दल नंतरच बोलू, असे त्यांनी स्पष्ट केले.ते म्हणाले, की महायुती शासनाने जसे मराठा समाजाला



पान २ वर...

## हिंदूंनो, किमान दोन मुले जन्माला घाला!

### पत्रकार परिषद : विश्व हिंदू परिषदेचे आवाहन

नागपूर/पुण्यभूमी प्रतिनिधी

फाळणीच्या वेळी बांगलादेशातील हिंदूंची संख्या ३२ टक्के होती. आता ती आठ टक्क्यांपेक्षा कमी झाली आहे. तेथील हिंदू सतत जिहादी अत्याचाराला बळी पडत आहेत. त्यामुळे प्रत्येक हिंदूने किमान दोन अपत्ये जन्माला घालावे, असे आवाहन विश्व हिंदू परिषदेच्या महाराष्ट्र आणि गोवा प्रांताचे क्षेत्र मंत्री गोविंद शेंडे यांनी केले.गोविंद शेंडे यांनी प्रसार माध्यमांशी संवाद साधला. ते म्हणाले, बांगलादेशमध्ये गेल्या काही वर्षात हिंदूंची संख्या ८ टक्क्यांपेक्षा कमी होत असल्यामुळे तेथील हिंदू आज अत्याचाराला बळी पडत आहेत. लिव्ह इन रिलेशनशीप कायम राहिले तर आपल्याकडे हिंदू अल्पसंख्यक होतील. हिंदूची संख्या जास्त असेल तरच लोकतंत्र टिकेल, अन्यथा भारतात सुद्धा बांगलादेशासारखी परिस्थिती निर्माण होईल. प्रत्येक हिंदूने दोन अपत्य जन्माला घातले पाहिजे तरच देश सुरक्षित राहील. सध्या बांगलादेश हिंसा आणि अराजकतेने ग्रासला आहे. तेथील पंतप्रधानांनी राजीनामा दिल्यानंतर आणि देश सोडून गेल्यानंतर अराजकतावादी अधिक प्रबळ झाले असून कायदा व सुव्यवस्था पूर्णपणे कुचकामी झाली आहे. या गोंधळाच्या परिस्थितीत तेथील अतिरेकी जिहादी घटकांनी




पान २ वर...

# विनेश'काले

विनेश फोगट या जिगरबाज, लढाऊ आणि कमालीच्या प्रतिकूलतेतही स्पर्धात्मकता कायम ठेवू शकणाऱ्या जिद्दी खेळाडूविषयी अतीव करुणा, सहानुभूती, सहवेदना व्यक्त केल्यानंतर ही काही उदाहरणे : २०१७ च्या आशियाई स्पर्धांत भारतीय धावपटू संघ बाद केला गेला, कारण धावताना त्यांच्याकडून 'अनवधानाने' मार्गिका (लेन) बदलली गेली. त्यानंतर दोन वर्षांनी २०१९ साली आंतरराष्ट्रीय स्क्वॉश स्पर्धांत भारतीय संघ आपल्या महामंडळाच्या दफ्तर दिरंगाईने पोहोचूच शकला नाही. त्याआधी एक वर्ष २०१८ च्या जाकार्ता आशिया स्पर्धेच्या उद्घाटनात भारतीय ध्वजवाहकांची भलतीच फजिती झाली. गेल्या टोकियो ऑलिम्पिक्समधून आपली कमलप्रीत कौर अशीच बाद ठरली. गेल्या सहस्राकात १९९८ सालच्या आंतरराष्ट्रीय स्पर्धांत पी. टी. उषा खिळ्यांचे बूट घालून धावल्या होत्या आणि २०१६ साली द्युती चांदकडूनही असाच प्रमाद घडला. नव्या सहस्राकाच्या पहिल्याच वर्षी २००० सालच्या स्पर्धांत सीमा पुनिया थाळीफेक स्पर्धेतून बाद केली गेली. आपला कोणी खेळाडू स्पर्धाकाळात खोकल्याचे औषध घेतल्याने बाद ठरतो तर कधी अन्य काही सेवन करू नये ते सेवन केल्याने स्पर्धेबाहेर काढला जातो. वरील उदाहरणे अगदी वानगीदाखल. क्रीडाप्रेमी, अभ्यासक अशी आणखी काही उदाहरणे देऊ शकतील. या सगळ्यांतून आपले काही दुर्गुण पुनःपुन्हा समोर येतात.व्यवस्था/ नियमन यांस गांभीर्याने न घेण्याची वृत्ती, सर्वत्र 'चलता है' मानसिकता, शास्त्रकाट्याच्या कसोट्यांपेक्षा उत्स्फूर्ततेवर वेळ मारून नेण्याची वृत्ती आणि या सगळ्यांच्या जोडीला याच दुर्गुणांनी युक्त भारतीय क्रीडा व्यवस्थापनाची बेफिकिरी. देशात काहींना काही वा त्यातील आणखी काहींना 'सर्व काही' मॅनेज करता येत असेल. येतेही. वाटेल ते गैरव्यवहार, नियमांकडे सर्रास काणाडोळा केला तरी त्यांचे काही बिघडत नाही आणि ते बिघडत नाही म्हणून सामान्यांनाही त्याबाबत काही वाटत नाही. ''कायद्यासमोर सर्व समान असले तरी काही अधिक समान असतात'', हे ऑर्वेली सत्य आपल्या जगण्याचे तत्त्वज्ञान! त्यामुळे नियम काटेकोरपणे पाळायचे असतात आणि आपण तसे नसलो तरी जगाच्या पाठीवर असे नियम पाळणारे असतात याचेच आपणास विस्मरण होते. हे वास्तव एकदा लक्षात घेतले की विनेश फोगट हिच्यासंदर्भात काय झाले, त्याचा विचार-विश्लेषण करणे सोपे ठरेल. विनेश ज्या वजनी गटात खेळत होती त्या गटात स्पर्धेआधी आणि नंतर वजनात किमान आणि कमाल किती फेरफार खपवून घेतला जातो, याचे नियम ऑलिम्पिक स्पर्धेआधीच निश्चित केले गेलेले असतात आणि इतक्या उच्च दर्जाच्या स्पर्धांत हे नियम कसोशीने पाळण्यासाठी काय काय खबरदारी घ्यायला हवी हेही विनेश आणि त्यापेक्षा तिच्या व्यवस्थापकांस ठाऊक असते. निदान तसे अपेक्षित असते. इतक्या उंचीवर स्पर्धक गेल्यावर त्याच्यासमवेत मानसोपचारतज्ज्ञासह आहार-विहारतज्ज्ञही असतोच असतो. स्पर्धा काळात काय खावे, काय खाऊ नये याचे नियमही या सर्वांस माहीत असतात. अशा स्पर्धांत एक फेरी संपल्यानंतर आणि पुढच्या फेरीच्या आधी वजन, अमली पदार्थ सेवन आदी चाचण्या होतात याचीही माहिती या सर्वांना अर्थातच असणार. असे असतानाही अंतिम फेरीच्या आधी तब्बल दोन किलोंनी विनेशचे वजन वाढू देण्याइतकी बावळट चूक या सर्वांकडून होतेच कशी? या दोन किलोंनी वाढलेल्या वजनांतील एक किलो आणि सुमारे ९०० ग्राम तिने रात्रभर घाम गाळून कमी केले. तरीही तिचे वजन कमाल वजनापेक्षा १०० ग्रामने जास्त भरले. साहजिकच अंतिम फेरीसाठी ती अपात्र ठरली. या अत्यंत दुर्दैवी घटनेवर देशभर गदारोळ उडणे साहजिक. त्यावर प्रतिक्रिया व्यक्त करताना मुष्टियोद्धा विजेंदर सिंग म्हणाला : अवघ्या १०० ग्राम वजनवाढीसाठी विनेशला अपात्र ठरवणे अयोग्य आहे.,हीच खरी आपली शोकांतिका. कमाल मर्यादा जर ५० किलोची आहे, त्यात आणखी एक किलोची सवलत मिळत असेल तर स्पर्धकाचे वजन ५१ किलोच्या आत हवेच हवे, हे अध्याहृत आहे. असे असताना ते विहित मर्यादेपेक्षा 'फक्त शंभर ग्राम' जास्त असल्यास 'गोड मानून' घ्यायला हवे, असे वाटतेच कसे? शास्त्रकाट्याच्या अचूक, नेमक्या कसोटीस सामोरे जाण्याची आपली मानसिकता का नाही? सगळ्यात आपले अनमानधपका धोरण आणि 'होऊन जाईल' ही वृत्ती! या सर्व नियम काट्यांकडे खेळाडूंनी लक्ष ठेवायचे की खेळावर लक्ष केंद्रित करायचे, असा प्रश्न यावर काहींचा असेल. त्याचे उत्तर असे की स्पर्धकांस खेळाकडे लक्ष देता यावे म्हणून तर व्यवस्थापकादी मंडळीचा इतका फौजफाटा त्यांच्या दिमतीला असतो. ते या प्रकरणात काय करत होते? हे सर्व सरकारी अधिकारी. एखादी फाइल इकडून तिकडे हलवणे आणि एखाद्या खेळाडूस उपांत्य फेरीतून अंतिम फेरीसाठी नेणे यातील किमान फरक या सर्वांस कळणे अपेक्षित. पण त्यांच्या कृतीवरून तसे म्हणता येत नाही. ''लष्करातील जवानांना ऑलिम्पिकला पाठवा पाच-दहा पदके ते 'यूँ करके' आणतील'', असे विधान आपल्याकडे सर्वोच्च सत्ताधीशच जर करत असतील तर ऑलिम्पिक स्पर्धा, त्यात सर्व गुणांचा लागणारा कस, एका सेकंदाच्या हजारपाचशेव्या सूक्ष्मातिसूक्ष्म कालमापनाची क्षमता आणि त्या कसोटीवर उतरण्यास तयार असलेले देशोदेशींचे स्पर्धक आदींचे गांभीर्य समाजास कसे असणार? अशा दर्जाच्या स्पर्धांमध्ये खिळे लावलेल्या बुटांनी स्पर्धेत धावायचे नसते, सर्दी-खोकल्याची औषधेही या काळात घ्यायची नसतात, धावताना मार्गिका बदलायची नसते इतक्या साध्या पण अत्यंत महत्त्वाच्या नियमांची आणि त्यांचे पालन करण्याच्या गांभीर्याची जाणीव याच समाजातील खेळाडूंना कोण आणि कशी करून देणार?

# कोचिंग क्लासेस मुळात हवेतच कशाला?

आपल्याकडे तरुणांचा देश म्हणून ओरड सुरू आहे मात्र , तोच तरुण सध्या कोणत्या अवस्थेतून जात आहे याचे मात्र कुणालाच काही देणे घेणे नाही. एकीकडे स्पर्धा परीक्षांची तयारी करणाऱ्या तरुणांच्या वयाचा वाढत असलेला नंबर तर दुसरीकडे वर्षानुवर्ष स्पर्धा परीक्षा क्लासेसचे संचालक होतायत गब्बर . देश तरुण म्हणून आपण कुठपर्यंत घोकणार आहोत?की, त्यांच्यासाठी काही करणार आहोत? याचा कुठलाच आराखडा सरकारकडे दिसून येत नाही. विविध विभागात शेकडो जागा रिक्त असताना त्या न भरता खासगी पद्धतीने भरून तरुणांची चेष्टा केली जात आहे. नुकत्याच दिल्लीतील घटनेने क्लासेस सेंटरची विद्यार्थ्यांसाठी केलेली व्यवस्था चव्हाट्यावर आली आहे. अलीकडील घटनेने देशाच्या नोकरशाहीत आपले स्थान मिळविण्याच्या आशेने या परीक्षांची तयारी करताना विद्यार्थ्यांना सोसाव्या लागणाऱ्या आर्थिक आणि मानसिक त्रासांनी पुन्हा एकदा डोके वर काढले आहे. अशा परीक्षांच्या तयारीसाठी विद्यार्थी देशभरातून दूर-दूरवरून महानगरात येतात, तेथील निवासस्थानाच्या शोषणात्मक पद्धतीमुळे प्रचंड मानसिक दबाव विद्यार्थ्यांसाठी जगण्याचा खेळ बनतो आहे.या दबावाला बळी पडून महाराष्ट्रातील एका विद्यार्थ्याने आत्महत्या करून मरण पावले, त्याच्या काही दिवसांपूर्वीच एका कोचिंग सेंटरच्या पूरग्रस्त तळघरात बुडून तीन विद्यार्थ्यांचा मृत्यू झाला.दिल्लीतील मुसळधार पावसात त्यांच्या राजिंदर नगर कोचिंग सेंटरच्या पूरग्रस्त तळघरात अडकलेल्या तीन नागरी सेवा इच्छुकांच्या बुडून मृत्यू झाल्याची सर्वोच्च न्यायालयाला ५ ऑगस्ट रोजी स्वतःहून दखल घ्यावी लागली यावरून स्पर्धा परीक्षा क्लासेस तरुणांच्या जीवांशी किती खेळत आहेत याची प्रचिती येते.

स्पर्धा परीक्षा किंवा इतर खासगी कोचिंग क्लासेस मुळात हवेतच कशाला? असा प्रश्न पडला तर किंवा या प्रश्नाची कुणाला पुसटशी कल्पना सुध्दा नसेल की, क्लासेस शिवाय मुलं स्पर्धेत टिकतील याचीही कधी कल्पना केली नसेल. पण करून बघा.विचार केला तर गेल्या दहा- पंधरा वर्षांपूर्वी असे क्लासेस किती होते?तर होते हेच माहिती नसेल तेव्हा सुद्धा स्पर्धा परीक्षा होत्या आजही आहेत.पूर्वी स्पर्धा परीक्षांची तयारी करणाऱ्यांची संख्या काही नगण्य असली तरी जागांची संख्या सुध्दा नगण्यच असायची. त्यामुळे यात काही किंचित तफावत असेल यात दुमत नाही. सध्याच्या घडीला स्पर्धा वाढली आहे हे कोणिही मान्य करेल पण स्पर्धा वाढली तशी जागाची संख्या सुध्दा वाढलेली दिसते तर अनेक क्षेत्रेही खुणावत आहेत.यात टिकायचे म्हणजे क्लासेस शिवाय टिकू शकत नाही. ही मानसिकता केवळ शहरांपुरती मर्यादित नाही तर ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना सुध्दा स्पर्धा करायची म्हटलं तर खासगी क्लासेस शिवाय पर्याय नाही ही हल्ली मानसिकता निर्माण करण्यात स्पर्धा परीक्षा क्लासेस सेंटरचाही हातभार म्हणावा लागेल.कारण, काही स्पर्धा परीक्षा चालवणारे खासगी क्लासेस सेंटर आपल्या जाहिरातीत असे ठासवतात की, जणू त्या विद्यार्थ्यांची काहीच मेहनत नाही.सगळं काही त्या सेंटरची किमया.या जाहिराती वर्तमानपत्रांची पानच्या पानं भरून येतात.





त्यामुळे या जाहिराती पाहून विद्यार्थ्यांचा क्लासेसकडे ओढा वाढतो आणि त्याशिवाय स्पर्धा परीक्षेत यश नाही अशी मानसिकता निर्माण होते हे सर्रास वास्तव चित्र आहे. मग, त्यातून आजच्या स्पर्धेच्या युगात स्पर्धा परीक्षा चालवणाऱ्या खासगी क्लासेसमध्ये स्पर्धा लागली आहे. कोणत्या क्लासेसचे विद्यार्थी किती शासकीय पदांवर लागले?त्यातून क्लासेसचा व्यवसाय पाहिला तर ही सेवा की आर्थिक बाजार बनली आहे. एकीकडे दिवसेंदिवस क्लासेस सेंटरच्या माध्यमातून आर्थिक बाजार मांडला जातो तर दुसरीकडे मुलांसाठी पालकांचा आर्थिक बाजार उठतो. बरं यात शासकीय नौकरीला लागण्याचा टक्का किती तर अगदीच नगण्य. तर काही म्हणजे एखादं दुसरा विद्यार्थी कोणतेही क्लासेस न लावता यशस्वी होतो.जसे पंधरा -वीस वर्षांपूर्वी होते.मग, खासगी क्लासेस कशासाठी?हा प्रश्न पडतो. जन्माला आलेली प्रत्येक व्यक्ती काही तरी विशेष वेगळेपण घेऊन जन्म घेते.जो तो त्या -त्या परिने प्रयत्न करतात आणि यशस्वी होतात.स्पर्धा परिक्षेत किंवा जीवनाच्या परिक्षेत. त्यामुळे अनेक जण आपापली वाट चोखळतात. कोणी स्पर्धा परीक्षांची तयारी करतो तर कोणी खासगी क्लासेस लावतो.त्या क्लासमधील काही मोजकेच विद्यार्थी यशस्वी होतात.तर इतरांची तितकी गुणवत्ता नसेल काय?हा प्रश्न. असे अनेक प्रश्न उपस्थित होतात म्हणून खासगी क्लासेस कशासाठी? क्लासेसचा हा गोरखधंदा गावपातळीपर्यंत येऊन ठेपलाय. त्यातून मोठ्या प्रमाणात आर्थिक उलाढाल होते. शहरात पावलापावलावर म्हटले तरी वावगे ठरू नये क्लासेस सेंटर आहेत.आजघडीला क्लासेस सम्राट लाखोंच्या चारचाकी गाड्यांमध्ये फिरतायत. ज्या शिक्षण क्षेत्रासाठी फुले दांपत्यानी जिवाची काड केली आणि इथल्या मातीत शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवली.त्या शिक्षणाचा बाजार खासगी क्लासेसवाल्यांनी रस्त्यावर आणाला आहे. सांगण्याचा मतलब म्हणजे दिल्लीतील एका क्लासेस सेंटरमध्ये पावसाचे पाणी शिरून दोन इच्छुक आयएएस विद्यार्थ्यांचा मृत्यू झाला.या सगळ्या प्रश्नांचं उत्तरं एकच आहे.त्याने प्रश्न उपस्थित होतो की, खासगी क्लासेस सेंटर कशासाठी? स्पर्धा परीक्षा सेंटरपेक्षा शालेय, माध्यमिक , उच्च माध्यमिक तसेच पदवी स्तरावर स्पर्धा परीक्षांची प्राथमिक माहिती दिली तर पुढे स्पर्धा परीक्षा देताना त्या प्राथमिक माहितीच्या आधारे विद्यार्थी अभ्यास करून स्पर्धेत उतरतील. त्यामुळे स्पर्धा परीक्षा क्लासेस वेगळे लावण्याची गरज पडणार नाही.त्यामुळे त्यावर बंदी घातली तर आणि शालेय स्तरावर प्राथमिक माहिती दिली तर याचा विचार करावा एवढेच.



पदमाकर उखळीकर,
मो.९९७५१८८९१२

# मनसेचे राज ठाकरे आज जिल्हा दौऱ्यावर

## पडघम : विधानसभा निहाय घेणार आढावा बैठक

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी



लोकसभा निवडणुकीत महायुतीला बिनशर्त पाठिंबा दिल्यानंतर महाराष्ट्र नवनिर्माण सेना आगामी विधानसभा निवडणुका स्वबळावर लढणार आहे. या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी महाराष्ट्र दौरा सुरु केला असून पहिल्या टप्प्यात त्यांनी मराठवाडा केंद्रीत केला आहे. दरम्यान, शुक्रवारी (दि.९) मनसे अध्यक्ष राज ठाकरे बीड जिल्हा दौऱ्यावर येणार असल्याची माहिती जिल्हाध्यक्ष सुमंत धस यांनी दिली.

लोकसभा निवडणुकीनंतर आता महाराष्ट्रात विधानसभा निवडणुकीचे वारे वाहत आहेत. सर्व राजकीय पक्षांनी या निवडणुकीची तयारी सुरु केली आहे. मनसेने देखील निवडणुकीच्या मैदानात उतरण्यासाठी कंबर कसली आहे. यंदाच्या विधानसभा निवडणुकीत मनसेची भूमिका महत्वाची असणार आहे. लोकसभा निवडणुकीआधी राज ठाकरे यांनी महायुतीला पाठिंबा जाहिर केला. मात्र आता नुकत्याच झालेल्या मनसेच्या मेळाव्यात मात्र राज ठाकरे यांनी मनसे महाराष्ट्रात विधानसभेच्या २५५- २५० जागा लढवणार असल्याचे जाहिर केले आहे. विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राज ठाकरे यांनी महाराष्ट्र दौरा सुरु केला आहे. दौऱ्याच्या पहिल्या टप्प्यात मनसे अध्यक्ष राज ठाकरे सोलापूरनंतर मराठवाडा दौऱ्यावर आहेत. सोलापूर, धाराशिव, नांदेड ,लातूर, हिंगोली, परभणी नंतर शुक्रवारी (दि.९) राज ठाकरे यांचे दुपारी १२ वाजता माजलगाव मार्गे बीड जिल्ह्यात आगमन होणार आहे.१ वाजता बीड शहरातील हॉटेल अन्विता येथे राज ठाकरे यांचे आगमन होईल. यानंतर राज ठाकरे जिल्ह्यातील पदाधिकारी, कार्यकर्त्यांची बैठक घेऊन विधानसभा मतदारसंघनिहाय आढावा घेणार आहेत. सायंकाळी मनसेच्या संपर्क कार्यालयाचे उदघाटन ठाकरे यांच्या हस्ते होणार असून ते बीड येथे मुक्कामी राहणार आहेत. शनिवारी (दि.१०) सकाळी ते जालन्याकडे रवाना होतील, अशी माहिती मनसे जिल्हाध्यक्ष सुमंत धस, राजेंद्र मोटे, श्रीराम बादाडे, महिला आघाडीच्या जिल्हाध्यक्षा वर्षा जगदाळे यांनी दिली.

# पान सह वरून

### साहित्य वाटपाने शैक्षणिक

कार्याला शुभेच्छा दिल्या. दरम्यान या शैक्षणिक साहित्य वाटप कार्यक्रमाचे प्रास्ताविकात बाबासाहेब ओव्हाळ यांनी केले. त्या प्रास्ताविकात गुरु आनंद महिला प्रतिष्ठानच्या कार्याची माहिती दिली. यावेळी विद्यार्थी ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### परळी तहसील कार्यालयावर

कॉ पप्पु देशमुख, कॉ मनोज स्वामी, कॉ विष्णु देशमुख आदींची प्रमुख उपस्थिती होती. या आंदोलनात तालुक्यातील शेतकरी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. यावेळी शेतकऱ्यांच्या घोषणेनी तहसीलचा परिसर दणाणुन गेला होता. मागण्यांचे निवेदन नायब तहसीलदार बाबुराव रुपनर यांना देण्यात आले. पिक कर्ज व बँकाच्या समस्या संबंधी सहाय्यक निबंधक, राष्ट्रीयकृत बँकांचे अधिकारी व किसान सभेचे पदाधिकारी यांची परळी तहसील कार्यालयात १३ ऑगस्ट रोजी बैठक बोलाविण्यात आली असल्याचे तहसील प्रशासनाने किसान सभेला पत्र दिले आहे.

### भुयारी गटार योजना चौकशीसाठी

सांडपाणीचे पाईप जोडण्यात आलेले नाहीत. किंवा गल्लोगल्ली येथील नाल्यांचे सांडपाणी या चेंबरमध्ये सोडण्याची कोणतीही सोय न करता चेंबरचे काम करण्यात येत आहे. अनेक ठिकाणी चेंबर उंच आहेत तर काही ठिकाणी खोल असल्याने नागरिकांचे अपघातही होत आहेत. संबंधित काम करणाऱ्या एजन्सीला २०१९ मध्ये नगरपरिषदेने काम दिले होते. पाच वर्षे झाले तरी अद्यापही काम चालूच आहे. दोन वर्षात वेळेवर काम न केल्यामुळे नगरपरिषदेने सुमारे एक कोटी रुपयांच्या जवळपास दंड श्रीनाथ इंजिनिअरिंग यांना ठोठावला होता या दंडाची रक्कम नगर परिषदेला भरली नसल्याचेही समजते. याबरोबरच सदर योजनेचे काम होत असताना या कामाचा अनुभव नसणाऱ्या मजुरांकडून शहरात काम करून घेण्यात येत आहे. या योजनेअंतर्गत शहरात होणाऱ्या कामाच्या गुणवत्तेची तपासणी करणारी यंत्रणाच परळी नगरपरिषद किंवा संबंधित एजन्सीकडे नव्हती. त्यामुळे नागरिकांना सांडपाणी रस्त्यावर येऊन प्रचंड त्रास सहन करावा लागत आहे . अद्यापही हे काम चालूच आहे. भविष्यात आणखी किती वर्षे लागतील याचीही शाश्वती नाही. तसेच नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण होणार आहे . या कामाच्या गुणवत्तेचे संपूर्ण तपासणी करण्यासाठी सर्वपक्षीय समिती गठित करण्यात येऊन कामाच्या गुणवत्तेची तसेच निकृष्ट कामाची चौकशी करून दिरंगाईचा दंड सदर एजन्सी कडून वसूल करावा व सदर एजन्सीला काळ्या यादीत टाकावे या मागणीसाठी पत्रकार रानबा गायकवाड १२ ऑगस्ट पासून परळी नगर परिषदेसमोर आमरण उपोषणाला बसणार आहेत.

### अन्यथा केज पंचायतसमोर

प्रत्येक ग्रामपंचायत अंतर्गत झालेल्या महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत खोदलेल्या विहीरीचे ४ लाख अनुदान व गायगोठा योजनेचे ७८ हजार शासनाकडून निधी मागवून लवकरात लवकर लाभार्थी यांना रक्कम मिळावी,अनुदान शासन कागदोपत्री प्रीक्रीया तात्काळ पुर्ण करुन लाभार्थ्यांच्या बँक खात्यात तात्काळ जमा करावे अन्यथा अखिल भारतीय कुणबी मराठा महासंघ केज तालुकाध्यक्ष रोहन गलांडे पाटील केज पंचायत समिती समोर आत्मदहन करण्याचा शासनाला इशारा रोहन गलांडे यांनी निवेदनाद्वारे दीला आहे.

### सचिन अन् नितीन शोलेतले

निमित्ताने सुजय दादा विखे-पाटील यांच्या हस्ते गरजुना सायकलीचे वाटप करण्यात आले या वेळी जिल्हाभरातून युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते

# पान एक वरून

### हॉकी संघाने सलग दुसऱ्यांदा

हरमनप्रीत सिंगने गोल करत भारताला आघाडी मिळवून दिली. पण स्पेन गोल करण्यात अपयशी ठरला. यानंतर तिसऱ्या क्वार्टरमध्येही भारताकडून हरमनप्रीतने पेनल्टीवर गोल केला. यासह भारताने २-१ अशी आघाडी मिळवली.भारत आणि स्पेनच्या संघांनी आतापर्यंत चांगली कामगिरी करत उपांत्य फेरी गाठण्यात यश मिळवले. मात्र, दोन्ही संघांना आपापल्या उपांत्य फेरीत पराभवाला सामोरे जावे लागले. भारतीय संघाला जर्मनीविरुद्ध किरकोळ पराभवाला सामोरे जावे लागले, तर स्पॅनिश संघाने नेदरलँडविरुद्ध जवळपास एकतर्फी सामना गमावला. भारतीय हॉकी संघाने यापूर्वी २०२० मध्ये टोकियो येथे झालेल्या ऑलिम्पिकमध्ये कांस्यपदक जिंकले होते. त्यावर्षीही भारताने शानदार खेळ केला आणि उपांत्य फेरी गाठली, पण तिथेही सुवर्ण आणि रौप्यपदकांच्या शर्यतीपूर्वी एक सामना गमावला. यानंतर भारत आणि जर्मनी यांच्यात कांस्यपदकाची लढत झाली, त्यात भारतीय हॉकी संघाने सामना जिंकून कांस्यपदक पटकावले.

### रस्ते दुरुस्तीच्या कामात

प्रधान सचिव ब्रिजेश सिंह, कोकण विभागीय आयुक्त पी.वेलारासु, जेएनपीटीचे अध्यक्ष उन्मेष वाघ, ठाणे पोलिस आयुक्त आशुतोष डुंबरे, पालघर जिल्हाधिकारी गोविंद बोडखे, नवी मुंबई महापालिका आयुक्त कैलास शिंदे यांच्यासह आदी अधिकारी उपस्थित होते.

### निवडणुक तोंडावर

आणला ते सांगावे राजस्थानी शेठजी जनतेला सांगावे मराठी म्हणी प्रमाणे ऐक तर मतदार संघात चोरासारखे व्यापारी म्हणून आले व जनतेला वेड्यात काढत राज्य करू लागले अशा भुरट्या शेठजीने वीस पंचवीस वर्षे झाले चोरांच्या उलट्या बोंबा म्हणी प्रमाणे मतदार संघ लुटुन संध्या उगाचच लातूर जवळ आहे रेल्वे स्टेशन जवळ आहे कारखाना आहे अशा थापा मारणे बंद करावे ते तर जुनेच आहेत अंबाजोगाई सहकारी साखर कारखाना स्वर्गीय डी एन पाटील साहेब यांनी आंबा कारखाना संस्थापक चेअरमन होते त्या कारखान्यात यांचं काय योगदान आहे तीन महिन्यावर विधानसभेच्या निवडणुका येऊन ठेपल्यामुळे दोन हजार कोटी आणले एमआयडीसी आणणार त्याचा सर्वे होणार काळवटी या ठिकाणी डोंगरावर एमआयडीसीचा मोजमाप करण्यात येणार हे अंबाजोगाईकरांना व केज मतदार संघातील मतदारांना भुरळ घालून भावनिक सात घालण्याचा केविलवाणी प्रयत्न करीत आहे कारण गेल्या २५ ते ३० वर्षापासून केज मतदार संघावर अधिराज्य करीत असताना बरेचसे चुका आणि बरंच पाणी पुलाखालून निघून वाहत गेलेल आहे ,आता कितीही आश्वासन दीले तरी आश्वासने घोषणा कामी येणार नाही मतदारानी ठरवलंय जसं इंग्रजांना सायमन परत जा घोषणा देउन भारतीय नागरिकांनी हाकालपट्टी केली होती ,तसेच केज मतदार संघातील मतदारांनी असं ठरवलंय मुंबईचे पार्सल मुंबईला परत करणार असे चर्चा सत्र नागरिकांन मधुन व्यक्त केले जात आहे.

### ईडीचा संचालक लाच

दरम्यान, या अधिकाऱ्याने खोट्या गुन्ह्यात अडकवण्याची धमकी देत एका व्यावसायिकाकडून तब्बल २० लाख रुपयांची मागणी केली होती. ही २० लाखांची लाच स्वीकारताना ईडीच्या सहाय्यक संचालकाला रंगेहात पकडण्यात आलं आहे. ईडीमध्ये दाखल झालेल्या गुन्ह्यात एका ज्वेलर्सच्या मुलाला दिलासा देण्याच्या बदल्यात ही लाच या अधिकाऱ्याने मागितली असल्याचं सांगितलं जात आहे.ईडीच्या सहाय्यक संचालकाने एका व्यावसायिकाकडून २० लाखांची लाच मागितल्याची तक्रार सीबीआयला प्राप्त झाली होती. या तक्रारीनंतर सीबीआयने तात्काळ सापळा रचत ईडीच्या अधिकाऱ्याला लाच घेताना रंगेहाथ पकडलं. या प्रकरणी आता लाच घेणाऱ्या अधिकाऱ्याच्याविरोधात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु असल्याची माहिती देण्यात येत आहे.

### वाटोळे करायचे हीच

फसविले, तसे धनगर समाजालाही फसविले आहे. सत्तेत येताना देवेंद्र फडणवीस यांनी धनगर समाजाला आपल्या सरकारच्या मंत्रिमंडळाच्या पहिल्याच बैठकीत आरक्षण देण्याचे आश्वासन दिले होते. परंतु, आजतागायत धनगर समाजाला आरक्षण मिळाले नाही. मराठा समाजालाही यापूर्वी १३ टक्के ओबीसी आरक्षण जाहीर केले. नंतर मागणी नसताना आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकाचे आरक्षण दिले. कुणबी जातीचे दाखले देण्याचा निर्णय जाहीर केला. परंतु यांपैकी काहीही मराठा समाजाच्या हातात पडले नाही. ही फसवणूक आहे, असा आरोप त्यांनी केला. मराठा समाज पूर्वीपासून धनगरांसह ओबीसी, मुस्लिमांसह बारा बलुतेदारांशी सौहार्दाचे संबंध बाळगून आहे. गावखेड्यात दररोज एकमेकांशी व्यवहार करताना कोठेही वाद होत नाही. परंतु महायुतीचे नेते आमच्यात भांडण लावण्याचा डाव खेळत आहेत. परंतु आमची मने दूषित होणार नाहीत, असा विश्वासही जरांगे-पाटील यांनी व्यक्त केला. मराठा समाजाला एकदा आरक्षण मिळाल्यानंतर मग धनगर, मुस्लीम, लिंगायत व इतरांना त्यांच्या हक्काचे आरक्षण कसे मिळत नाही, ते पाहू, असा निर्धारही त्यांनी बोलून दाखविला.

### हिंदूंनो, किमान दोन मुले

हिंदू समाजावर मोठ्या प्रमाणावर अत्याचार सुरू केले आहेत. बांगलादेशमध्ये गेल्या अनेक दिवसांपासून हिंदू अल्पसंख्याकांची धार्मिक स्थळे, व्यापारी प्रतिष्ठाने आणि घरांचे नुकसान करण्यात आले. हे भयंकर कृत्य बांगलादेशातील प्रत्येक जिल्ह्यात घडत आहे. मंदिरांचे मोठे नुकसान झाले आहे. बांगलादेशात क्वचितच असा कोणताही जिल्हा शिल्लक असेल जो त्यांच्या हिंसाचाराचे लक्ष्य बनला नसेल. वेळोवेळी होणाऱ्या अशा दंगलींचाच हा परिणाम आहे की फाळणीच्या वेळी बांगलादेशातील हिंदूंची संख्या आता केवळ टक्क्यांपेक्षा कमी झाली आहे आणि ते सतत अत्याचाराला बळी पडत आहेत. या परिस्थितीत भारत नक्कीच दुर्लक्ष करू शकत नाही. जगभरातील शोषित आणि विस्थापित लोकांना मदत करणे ही आपली परंपरा राहिली आहे. बांगलादेशातील अल्पसंख्याकांच्या रक्षणासाठी केंद्र सरकारने शक्य ती सर्व पावले उचलावीत, असे आवाहन विश्व हिंदू परिषदेने केले आहे. मात्र अशा बिकट परिस्थितीचा फायदा घेत जिहादी सीमेपलीकडून घुसखोरी करण्याचा प्रयत्न करू शकतात. याबाबत सावध राहणे गरजेचे आहे, असेही शेंडे म्हणाले. यावेळी विदर्भ प्रांत मंत्री प्रशांत तितरे, निरंजन रिसालदार उपस्थित होते.

संपादक : **बाळासाहेब भगवान मस्के**, कार्यकारी संपादक : **सुनिल मसू डोंगरे**
हे दैनिक प्रकाशक,मुद्रक,मालक,संपादक बाळासाहेब भगवान मस्के यांनी बी.एम.प्रिंटर्स अॅन्ड पब्लिकेशन, बीड, ता.जि.बीड येथे छापून दैनिक बीड पुण्यभूमी तहसीलच्यामागे, डीपी रोड बीड (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.
(अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.) न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत दुरध्वनी-०२४४२-२९९०८४,ई-मेल-beedpunyabhumi@gmail.com
Daily Beed punyabhumi hews paper owner, publisher, Edit Balasaheb Bhagwan Maske has printed at B.M. printexs, behing the tehsil, dp road (Maharashtra) 431122
Published at daily Beed Punyabhumi office, behing the tehsil, dp road, beed -431122 Phone No. (02442)299084, Email-beedpunyabhumi@gmail.com

दररोजच्या घडामोडीसाठी वाचत रहा... पुण्यभूमी

# बीडमध्ये पवनचक्की कंपन्यांची दडपशाही

## डॉ.गणेश ढवळे : कानडीघाट येथे पोलिसांचा फौजफाटा

चौसाळा/पुण्यभूमी प्रतिनिधी

बालाघाटावर पवनचक्की कंपन्यांचे मोठ्या प्रमाणावर पेव फुटले असुन पवनचक्की कंपन्यांच्या मनमानी कारभार विरोधात आज दि.८ गुरुवार रोजी कानडीघाट येथील शेतकरी आक्रमक झाले असुन त्यांनी टॉवरची तार ओढण्याचे काम बंद पाडले असून अगोदर आम्हाला आमच्या शेतातील टॉवर उभारणी कामाचा तसेच उभ्या पिकातुन तार ओढणीचे काम केल्यास पिकांचे नुकसान होणार असुन अगोदर भरपाई द्या त्यानंतरच तार ओढण्याचे काम करा अशी भूमिका घेतली .पवनचक्की कंपन्यांनी अरेरावीची भाषा करत सुरूवातीला दंडेलशाही पद्धतीने काम रेटण्याचा प्रयत्न केला त्यामुळे शेतकरी आणखीनच आक्रमक झाले. पवनचक्की कंपन्यांच्या आधिका-यांनी पोलिसांना पाचारण केल्यानंतर गावात मोठ्या प्रमाणावर पोलीस पाऊस फाटा जमा झाला होता त्यामुळे गावामध्ये काहीकाळ तणावाचे वातावरण होते. अखेर पवनचक्की कंपन्यांचे अधिकारी व कर्मचारी काम न करताच निघून गेले.बालाघाटावर सध्या पवनचक्की प्रकल्प उभरणा-या कंपन्यांचे पेव फुटले असुन परराज्यातील कंपन्या स्थानिक दलालांना हाताशी धरून अशिक्षित शेतकऱ्यांना लालुच दाखवून त्यांची दिशाभूल करून जमिनी ताब्यात घेत असुन पोलिस प्रशासनाच्या बळाचा गैरवापर करत दमदाटी करण्याचा प्रयत्न करत आहेत तसेच राजकीय लोकांचे कार्यकर्ते यांच्या मार्फत दबाव तंत्राचा वापर जमिनी बळकावण्यासाठी करत असल्याच्या तक्रारीत वाढ झाली आहे. राजकीय शक्तींचा वापर करून शेतकऱ्यांना खोटे गुन्हे दाखल करण्याच्या धमक्या देत असल्याचा आरोप शेतकऱ्यांनी केला आहे. शेतक-यांच्या पाठीशी उभे राहण्याऐवजी आर्थिक लाभापोटी कंपन्यांची पाठराखण करताना दिसुन येत असल्याची खंत डॉ. गणेश ढवळे यांनी व्यक्त केली.



### दिशाभूल आणि फसवणूक

गोलंग्री,कानडीघाट,सुलतानपुर या गावांमध्ये ओ २ कंपन्यांचे टॉवर उभारणे आणि तार ओढण्याचे काम सुरू असून शासकीय परीपत्रकाप्रमाणे नुकसान भरपाई देण्यासाठी ३५ मीटर रूंदीचा नियम असताना जुने शासकीय परीपत्रके दाखवून १६ मीटर प्रमाणे नुकसान भरपाई घ्या म्हणतात तसेच याठिकाणी उभारलेल्या २६ टावर उभारण्यात आले असुन प्रत्येकाला नुकसान भरपाईचा मोबदला वेगवेगळा दिलेला आहे. गंभीर बाब म्हणजे या शेतकऱ्यांकडे करारनाम्याची प्रत नाही दिशाभूल करून सह्या घेतलेल्या आहेत.मे मध्ये ज्या शेतकऱ्यांच्या शेतात टावरचे काम झाले आहे त्यांना अद्याप मोबदला देण्यात आलेला नाही. एकंदरीतच शेतक-यांच्या अज्ञानाचा गैरफायदा कंपन्यांचे अधिकारी घेत असुन पोलिस प्रशासन शेतकऱ्यांच्या पाठीशी न उभे राहता कंपन्यांच्या बाजुने उभे रहाताना दिसत आहे. असे मत श्रीकांत कवडे यांनी व्यक्त केले.

# श्रावणातील शहाडा वाजविण्याची परंपरा कायम

## जपवणूक : सोयगावच्या १५ गावात वाजविला जातोय शहाडा

सोयगाव/पुण्यभूमी प्रतिनिधी

श्रावण महिन्याला फार मोठे महत्व आहे श्रावण महिन्याला सुरुवात होताच रोज शहाडा देण्याची सोयगावच्या पंधरा गावातील रूढी परंपरा आजही कायम आहे ही परंपरा अनेक वर्षांपासून या पंधरा गावात चालत आलेली आहे त्यामुळे या पारंपारिक रुढीची सुरुवात कधी पासून सुरू आहे हे सांगणे जुन्या जाणत्या वृद्धांना ही सांगणं कठीण झाले आहे

सोयगाव तालुक्यातील सोयगाव सह निंबायती,जरंडी माळेगाव पिंपरी रामपुरा तांडा कवली बहुलखेडा निमखेडी उमर विहिरे,घोसला नांदगाव नांदगाव तांडा या गावात ही शहाडा देण्याची रूढी शतकोत्तर काळापासून चालत आलेली आहे यामध्ये दररोज पहाटे पाच वाजता आणि सायंकाळी सहा वाजता गावातील देव देवतांच्या मंदिरे गावच्या शिव आणि गावचे शिवार या ठिकाणी ढोल व डफडे वाजवून तीन ते पाच मिनिटे गावातील हालचाली बंद करण्यात येतात त्यामुळे शहाडा देतांना ही गावे तीन मिनिटे स्तब्ध होतात गावातील एका व्यक्तीला डफडे वाजविण्याची जबाबदारी संबंधित ग्रामपंचायतींनी दिलेली असते त्यामुळे श्रावणात महिना भर पहाटे पाच व सायंकाळी सहा वाजता हा श्रावण शहाडा दिल्या जातो ही परंपरा शतका पासून सुरू आहे या रुढी मध्ये पहाटे पाच वाजता देवी देवतांच्या मंदिरा समोर ढोल किंवा डफडे वाजविले जाते सायंकाळी ही हीच पद्धत आहे या रुढी मधून जुन्या जाणकारांनी गावात शांतता नांदावी यासाठी श्रावण महिन्यात ही परंपरा सुरू केल्याचे बोलले जाते



ही परंपरा गावात खूप दिवसापासून सुरू आहे श्रावण महिना आला की पहाटे व सायंकाळी देवी देवतांच्या मंदिरे गावचे शिव आणि गावचे शेत शिवार या ठिकाणी तीन मिनीट पहारा देण्याची पद्धत आहे ही परंपरा अनेक दिवसापासून सुरू आहे यातून खरिप हंगामात उत्पन्न चांगले यावे यासाठी साकडे घालण्याची व गावातील अनिष्ट संकट दूर जावे हीच परंपरा आहे.

–शेनफडू मोहिते, (वय ८५) वृद्ध नागरिक जरंडी

# दप्तर दिरंगाई थांबवून योजनांचा लाभ द्या

## आ. संदिप क्षीरसागर : योजनेसाठी लाभार्थी प्रतीक्षेत



बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

महसूल विभागाच्या मार्फत राबवल्या जाणाऱ्या विविध योजनांच्या संदर्भात विभागाकडून दप्तर दिरंगाई केली जात असून अनेक पात्र नागरीक लाभाच्या प्रतीक्षेत आहेत.अर्जप्रक्रिया आणि प्रस्ताव निकषपात्र असताना अनेक लाभार्थ्यांना विभागाच्या अनास्थेमुळे त्रास सहन करावा लागत असून यावर आ. संदिप क्षीरसागर यांनी तातडीने सर्व प्रकरणे निकाली काढून लाभार्थ्यांना, लाभ वितरित करा अशा सूचना दिल्या आहेत.

बीड मतदारसंघ क्षेत्रातील बीड आणि शिरूर का. तहसील अंतर्गत अनेक निकषपात्र नागरिकांनी संजय गांधी निराधार अनुदान योजना , श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्ती वेतन योजना, आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबासाठी असलेल्या विविध योजना, दिव्यांग बांधवांसाठीच्या योजना इत्यादी योजनांसाठी अर्ज व प्रस्ताव दाखल केलेले आहेत. परंतु महसूल विभाग आणि तहसील प्रशासनाच्या दिरंगाई आणि अनास्थेमुळे गेल्या अनेक दिवसांपासून हे प्रस्ताव प्रलंबित आहेत. यामुळे पात्र असलेल्या लाभार्त्यांना लाभापासून वंचित राहावा लागत आहे व विनाकारण त्रास सहन करावा लागत आहे. हि बाब लक्षात घेता आ. संदीप क्षीरसागर यांनी यासंदर्भात तात्काळ कार्यवाही करून संबंधित नागरिकांना लाभाचे वितरण करावे अशा सूचना बीड व शिरूर (का.) तहसीलदारांना दिल्या आहेत. तसेच याबाबत आ.क्षीरसागर यांनी विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी व उपविभागीय अधिकारी यांच्याकडेही पत्रव्यवहार केला आहे.

# लाडकी बहीण योजना पोर्टल पूर्ववत

## योजना : लाडक्या बहिणींची होतेय गर्दी



सोयगाव/पुण्यभूमी प्रतिनिधी

शासनाच्या लाडकी बहीण योजनेचे शासनाने वंचित व पात्र महिलांना अर्ज करण्यासाठी गुरुवारी दुपारी एक वाजता नवीन पोर्टल सुरू केले पण या पोर्टलवर योजनेचा अर्ज भरण्यासाठी आधार कार्डला मोबाईल नंबर लिंक असेल तरच अर्ज सबमिट करता येतो त्यामुळे गुरुवार पासून पुन्हा आधार कार्डला मोबाईल नंबर लिंक करण्यासाठी महिलांची तोबा गर्दी पहावयास मिळाली आहे

लाडकी बहीण योजनेचे शासनाने यापूर्वी चे दिलेले नारी शक्ती हे ऍप्स बंद करून आता नवीन संकेतस्थळ सुरु केले आहे नारीशक्ती ऍप्स बंद झाल्याने (दि ०१) आगस्ट पासून योजनेचे अर्ज भरण्याची काम ठप्प झाले होते त्यामुळे तब्बल आठ दिवसांच्या प्रतिक्षे नंतर गुरुवारी (दि ०८) नवीन संकेतस्थळ सुरु झाले परंतु या नवीन संकेतस्थळ वर महिलांचा अर्ज भरतांना पात्र महिलेच्या आधार कार्डला मोबाईल नंबर लिंक असणे अनिवार्य आहे मोबाईल नंबर लिंक नसेल तर त्या महिलेला अर्ज भरण्यापूर्वी अनुमती देण्यासाठी ओ टी पी मिळत नाही त्यामुळे अर्ज भरण्यासाठी पुढील प्रक्रिया होत नाही त्यामुळे गुरुवारी दुपार पासून आधार कार्डला मोबाईल नंबर संलग्न करण्यासाठी महिलांच्या मोठी गर्दी दिसून येत होती

### पूर्वीचे नारीशक्ती ऍप्स बंद

या आधी लाडकी बहीण योजनेचा अर्ज भरण्यासाठी नारीशक्ती ऍप्स दिलेले होते ते बंद करून आता नवीन संकेतस्थळ सुरु करण्यात आले आहे त्यामुळे नवीन संकेतस्थळ वर अर्ज स्वीकारले जात असून अर्ज भरण्याची अंतिम मुदत (दि ३१) आगस्ट पर्यंत असून आधार कार्डला मोबाईल नंबर लिंक करण्यासाठी किमान आठवड्याचा कालावधी लागतो त्यामुळे वंचित व पात्र महिलांची लाडकी बहीण योजनेसाठी गोची झाली आहे.

# आरती बोराणा यांच्या उपवासाची पचकावणी

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

बीड तालुक्यातील चौसाळा येथील पावन भूमी मध्ये परमपूज्य श्री दिलीपकवरजी म.सा. यांच्या सुशिष्या स्वाध्याय प्रेमी परमपूज्य श्री कुसुमकँवरजी म.सा. आणि प्रवचन प्रभाविका परमपूज्य श्री अरुणप्रभाजी म.सा. आधी ठाणा २ यांच्या सानिध्या मध्ये सौ आरती वर्धमान बोराणा रा.तेरखेडा ता.वाशी जि.धारशिव यांनी निरंकार ११उपवास केले असून त्याची पचकावणी शनिवार दि.१०/०८/२०२४ रोजी चौसाळा येथे होणार आहे

चौसाळा सारख्या छोट्या गावामध्ये जैन समाजाचे कमी घरे असताना २४ वर्षानंतर चातुर्मासचा योग आला सध्या एकासना ,आंबील ,वास ,तेला, आठाई अशा बऱ्याच तपस्या चालू आहेत सौ. आरती बोराणा लोग्गस अराधक श्री कांतिलाल बोराणा यांच्या सुन व चौसाळ्याचे श्रीमती कमल जवाहरलाल खिवंसरा यांची मुलगी आहे ते अपल्या माहेरी चातुर्मास आहे ११उपवास करु श्री वर्धमान जैन स्थानक चौसाळा येथे ९:०० (नऊ वाजता) त्यांची पचकावणी होणार आहे

चातुर्मास चे मार्गदर्शक सुभाषचंद बेदमूथा आणि अशोक लोढा आहेत पचकावणी झाल्यानंतर गौतम प्रसाद ठेवलेला आहे लाभार्थी संजय कांतीलाल बोराणा तेरखेडा अशी माहिती चातुर्मास कमिटी अध्यक्ष आनंद नहार, संदेश खिवंसरा, नितीन लोढा, वृषभ धोका ,उमेश लोढा ,सतीश कोचर, आनंद लोढा ,भूषण खिंवसरा, मयूर नहार , रोशन खिंवसरा,रमण कोचर, राजेश लोढा, पारस धोका ,अनुप बेदमुथा, विनोद धोका, संतोष लोढा, देवेंद्र बोराआणि श्री वर्धमान जैन श्रावक संघ चौसाळा यांनी दिली आहे.



# नालंदा फाउंडेशनकडून पुरस्कार घोषित!

## अभिनंदनिय : डॉ.संजय मोहडांना वामनदादा कर्डक पुरस्कार

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

महाकवी वामनदादा कर्डक यांच्या जयंतीनिमित्त नालंदा फाउंडेशन बीड यांच्या वतीने प्रतिवर्षी दिला जाणारा महाकवी वामनदादा कर्डक राज्यस्तरीय पुरस्कार डॉ. संजय मोहड प्रोफेसर आणि संगीत विभाग प्रमुख, स.भु. कला व वाणिज्य महाविद्यालय, छत्रपती संभाजीनगर यांना जाहीर करण्यात आला असल्याची माहिती संयोजन समितीच्या वतीने देण्यात आली आहे.



नालंदा फाउंडेशन बीड यांच्या वतीने सामाजिक क्षेत्रामध्ये काम करणाऱ्या व्यक्तींना त्यांनी दिलेल्या योगदानाबद्दल दरवर्षी महाकवी वामनदादा कर्डक राज्यस्तरीय पुरस्काराने सन्मानित करण्यात येते. यावर्षीचे मानकरी प्रो.डॉ.संजय मोहड हे आहेत. त्यांनी दिलेल्या योगदानाबद्दल त्यांचा यथोचित सत्कार नालंदा फाउंडेशन बीड यांच्या वतीने करण्यात येणार आहे.या पुरस्काराचे स्वरूप २५ हजार रुपयांचा धनादेश, स्मृति चिन्ह, सन्मानपत्र असे आहे. प्रो.डॉ.संजय मोहड यांनी फुले– शाहू– आंबेडकर विचारांची पेरणी करत आपल्या साहित्याच्या माध्यमातून त्यांची विचारधारा जनमानसात पोचवण्याचे कार्य केले आहे. त्यांच्या उल्लेखनीय कार्याची दखल घेत नालंदा फाउंडेशन बीड यांच्या वतीने १५ ऑगस्ट २०२४ रोजी सायंकाळी ६ वाजता यशवंतराव चव्हाण नाट्यगृह बीड येथे नालंदा फाऊंडेशनचे अध्यक्ष प्रा.प्रदिप रोडे यांच्या हस्ते महाकवी वामनदादा कर्डक राज्यस्तरीय पुरस्काराने त्यांना सन्मानित करण्यात येणार आहे. अशी माहिती संयोजन समितीच्या वतीने देण्यात आली आहे.

## योजना : अर्जांची छाननी करुन स्वीकृती संदेश

# लाडक्या बहिण योजनेचे पैसे होणार जमा!

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

बीड जिल्ह्यामध्ये आतापर्यंत ३ लाख ५२ हजार ८८० महिलांनी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण या योजनेमध्ये अर्ज दाखल केले असून ९४.३४ % टक्के अर्जांची छाननी करून मोबाईलव्दारे स्वीकृती संदेश देण्यात आले आहेत.

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेमध्ये लाभार्थी महिलांची नोंदणी आणि अर्जाची पडताळणी करण्याची विशेष मोहीम जिल्ह्यात सुरू असून याअंतर्गत ३ लाख ५२ हजार ८८० महिलांनी दाखल केलेल्या अर्जाची छाननी करून ३,३२,८९२ लाभार्थी महिलांच्या अर्जांना स्वीकृती देऊन मोबाईल संदेश पाठविण्यात आलेले असून आजपर्यंत ९४.३४ %टक्के काम झालेले आहे.

ज्यांचा ऑनलाईन अर्ज भरतांना कागदपत्राच्या बाबतीत काही त्रुट्या आढळून आले आहेत. त्यांच्या मोबाईलवर संदेश जात असून अश्या अर्जदार महिलांनी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेअंतर्गत नारी शक्ती दूत पच्या माध्यमातून ज्या मोबाईल ऍप वरून ऑनलाइन अर्ज भरला आहे त्याच मोबाईल मधून अर्ज दुरूस्त (एडिट) करून अर्जाची त्रुटी पूर्तता पूर्ण करून घ्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे. या महिला अर्जदारांनी अर्जासोबत आवश्यक सर्व कागदपत्रे जोडलेले आहेत त्यांचे अर्ज स्वीकृती देण्यात येत आहे. व तसा संदेश महिला अर्जदारांच्या मोबाईलवर जात आहे स्वीकृती असा संदेश आल्यास आपला अर्ज यशस्वीरिता भरला गेला असल्याचे कळते. तथापि ज्या महिला अर्जदारांना आपला अर्ज पार्शली रिजेक्टेड असा मोबाईल संदेश आलेला आहे त्यांनी तात्काळ नारी शक्ती दूत पच्या माध्यमातून ज्या मोबाईल ऍप वरून ऑनलाइन अर्ज भरला आहे त्याच मोबाईल ऍप मधून अर्ज एडिट करून अर्जाची त्रुटी पूर्तता पूर्ण करून घ्यावी, असे आवाहन, जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांनी केले आहे.



# विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप



बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

वडवणी तालुक्यातील उपळी या गावात ऑल इंडिया पँथर संघटनेचे संस्थापक अध्यक्ष दीपक केदार यांच्या वाढदिवसानिमित्त बीड जिल्हा सचिव शेख वसीम यांच्या मार्फत उपळी जिल्हा परिषद शाळेतील विध्यार्थ्यांना इतर खर्च न करता एक अगडा वेगडा उपक्रम राबवून लहान मुलांना वह्या व पेन देऊन वाढदिवस साजरा करण्यात आला यावेळी मुख्याध्यापक शेख मॅडम श्रीमती पाटील मॅडम ,सोनटक्के मॅडम

श्री चव्हाण सर, ढवळशंख सर, राठोड सर श्री अब्दुल रशीद खान सर मुख्याध्यापकश्री शहजाद आली शेख सर, शेख फारूक, संजय इचके, आकाश सौंदरमल, दिनेश सौंदरमल, अजीम पठाण, चेतन सौंदरमल, गणेश पवार, जावेद शेख व इतर शिक्षक वृंद व कार्यकर्ते उपस्थित होते.

# भाजपा नेते निलेश राणे यांचा शब्द अन् निधी मंजूर

## हिवाळे बौद्धवाडी-धुरीवाडी जोडणाऱ्या साकव दुरुस्ती- उभारणीसाठी १० लाख रूपयांचा निधी जिल्हा नियोजनमधून मंजूर

**मालवण(प्रतिनिधी)**



मुसळधार पावसात साकव कोसळून वाहून गेल्याची घटना हिवाळे बौद्धवाडी-धुरीवाडी येथे घडली होती. साकव दुरुस्ती उभारणीसाठी जिल्हा नियोजन मधून १० लाख निधी मंजूर झाला आहे.

हिवाळे गावातील बौद्धवाडी-धुरीवाडी जोडणरा साकव काही भाग मागील महिन्यात मुसळधार पावसात कोसळून वाहून गेला. भाजपा नेते निलेश राणे यांनी तातडीने त्या ठिकाणी भेट देऊन पाहाणी केली. आवश्यक निधीची उपलब्धता करून लवकरात लवकर साकव उभारणी बाबत कार्यवाही केली जाईल असा शब्द येथील ग्रामस्थ यांना दिला होता. त्यानुसार निलेश राणे यांनी पाठपुरावा करून खा. नारायण राणे, पालकमंत्री रवींद्र चव्हाण यांच्या माध्यमातून जिल्हा नियोजन मधून १० लाख निधी उपलब्ध करून साकव उभारणी काम तातडीने मंजूर करून घेतले आहे. अशी माहिती माजी सभापती महेंद्र चव्हाण, सरपंच रघुनाथ धुरी यांनी दिली आहे. दरम्यान, खा. नारायण राणे, पालकमंत्री रवींद्र चव्हाण, भाजपा नेते निलेश राणे यांचे हिवाळे ग्रामस्थ यांसह सरपंच रघुनाथ धुरी, माजी वित्त व बांधकाम सभापती महेंद्र चव्हाण यांनी आभार मानले आहेत.

# नेमळे एरंडवाकवाडी ग्रामस्थांची समस्या दूर न केल्यास स्वातंत्र्यदिनी उपोषण

## महामार्ग प्राधिकरणला स्थानिक ग्रामस्थांचा इशारा

**सावंतवाडी (प्रतिनिधी)**

मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्गाच्या झाराप पत्रादेवी बायपासवर असलेल्या नेमळे एरंडवाकवाडी येथे सातत्याने होत असलेल्या अपघातांच्या अनुषंगाने स्थानिक ग्रामस्थ प्रचंड आक्रमक झाले आहेत. महामार्ग प्राधिकरणाने आपल्या समस्यांबाबत त्वरित उपाययोजना न केल्यास येत्या १५ ऑगस्ट रोजी स्वातंत्र्यदिनी महामार्ग प्राधिकरणाच्या सावंतवाडी येथील कार्यालयासमोर उपोषण छेडण्यात येईल असा इशारा त्यांनी दिला आहे.

झाराप ते पत्रादेवी महामार्गावर नेमळे गावात अलीकडेच कोट्यावधी रुपये खर्च करून ओव्हर ब्रिज बांधण्यात आला आहे. हा ब्रिज बांधल्यानंतर नेमळे एरंडवाकवाडी तसेच गावकर कुंभारवाडी येथे स्थानिक ग्रामस्थांना इजा करण्यासाठी देण्यात आलेले महामार्गावरील कट महामार्ग प्राधिकरण कडून तात्काळ बंद करण्यात आले. मात्र, सदरच्या ओव्हर ब्रिज वरून एरंडवाकवाडीत जाण्यासाठी असलेला रस्ता नादुरुस्त तसेच फार मोठा वळसा घालून असल्याने स्थानिक ग्रामस्थांना मोठ्या समस्यांना तोंड द्यावे लागत आहे.

तसेच या ठिकाणी ठेवण्यात आलेल्या बॉक्सेलमध्ये पावसाळ्यात मोठ्या प्रमाणात चिखलाचे साम्राज्य पसरले असल्यामुळे त्यातून मार्गक्रमण करणे जिकरीचे बनले आहे. या वाडीत शेतकऱ्यांना खते तसेच अन्य गृहपयोगी वस्तू टेम्पोतून न्याव्या लागतात. मात्र, या बॉक्सेल मधून टेम्पो व अन्य मालवाहू वाहने प्रवेश करू शकत नसल्याने महामार्गावरून अक्षरशः डोक्यावरून सदर वस्तू तीन ते चार किलोमीटर वाडीत स्थानिक ग्रामस्थांना न्याव्या लागत आहेत. त्यामुळे याबाबत स्थानिक ग्रामस्थांमधून तीव्र संताप व्यक्त होत आहे.

महामार्गाचे ज्यावेळी भूसंपादन झाले त्यावेळी केवळ २०० ते ३०० रुपये प्रति गुंठा दराने या भागातील लोकांच्या जमिनी घेण्यात आल्या. त्यानंतर तब्बल २२ वर्षांनी या बायपासचे काम पूर्ण करण्यात आले. मात्र स्वतःच्या जमिनी देऊन देखील आता येथील स्थानिक शेतकरी व ग्रामस्थांना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागत आहे. या भागातील काही तरुणांचा तसेच ग्रामस्थांचा महामार्गावरील अपघातात बळी गेला आहे. योग्य पर्यायी मार्ग नसल्याने महामार्गावरील शेतकऱ्यांना तसेच ग्रामस्थांना व विद्यार्थ्यांना जीव मोठे घेऊन रस्ता ओलांडून जावे लागते. त्यामुळे सातत्याने या ठिकाणी अपघात होत असल्याने याबाबत कायमस्वरूपी उपाययोजना करण्यात यावी अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे.

याबाबतचे निवेदन स्थानिक ग्रामस्थांनी महामार्ग प्राधिकरणला दिले असून याबाबत त्वरित उपाययोजना न झाल्यास येत्या १५ ऑगस्ट रोजी स्वातंत्र्यदिनी महामार्ग प्राधिकरणच्या सावंतवाडी कार्यालयासमोर उपोषणाचा मार्ग अवलंबवावा लागेल, असा इशारा देखील त्यांनी या निवेदनाद्वारे दिला आहे.

# वानिवडे सरपंच संयोगी घाडी लाल किल्ल्यावरील ध्वजारोहण समारंभाला विशेष अतिथी म्हणून निमंत्रित

**देवगड (प्रतिनिधी)**



वानिवडे सरपंच संयोगी घाडी यांना १५ ऑगस्ट रोजी दिल्लीतील लाल किल्ल्यावर होणाऱ्या ध्वजारोहण समारंभाला विशेष अतिथी म्हणून उपस्थित राहण्याचे निमंत्रण सरकारकडून मिळाले आहे. देवगड तालुक्यातील वानिवडे गावच्या सरपंच संयोगी घाडी यांना भारत सरकारच्या पंचायत राज मंत्रालयाने १५ ऑगस्ट रोजी दिल्लीच्या लाल किल्ल्यावर ध्वजारोहण कार्यक्रमात सहभागी होण्याचे निमंत्रण दिले आहे. या कार्यक्रमात सहभागी होण्यासाठी भारत सरकारच्या पंचायती राज मंत्रालयाकडून आवश्यक सूचना देण्यात आल्या आहेत. याचे पालन करणे महत्त्वाचे आहे. नामनिर्देशित प्रतिनिधी आणि त्यांचे कुटुंबीय १३ ऑगस्ट रोजी दिल्लीला पोहोचणार आहेत. स्वातंत्र दिन सोहळ्याला उपस्थित राहण्यासाठी केंद्र सरकारकडून प्रतिनिधींना निमंत्रण पत्रे दिली जातील. १४ ऑगस्ट रोजी पंचायत राज मंत्रालयाकडून महिलांच्या समस्यांवर कार्यशाळा आणि इतर कार्यक्रम आयोजित केले जातील. १५ ऑगस्ट रोजी दिल्लीतील लाल किल्ल्यावर होणाऱ्या स्वातंत्र्यदिनाच्या सोहळ्याला ते उपस्थित राहणार आहेत.

# ज्येष्ठ नागरिक वैद्यकीय सुश्रुषा, उपचार, पुनर्वसन व संशोधन केंद्र

## रेडकर हॉस्पिटल रिसर्च सेंटरचा उपक्रम ; पालकमंत्री रवींद्र चव्हाण यांच्या हस्ते होणार आज लोकार्पण

**मालवण (प्रतिनिधी)**

रेडकर हॉस्पिटल रिसर्च सेंटरच्या ज्येष्ठ नागरिक वैद्यकीय सुश्रुषा, उपचार, पुनर्वसन, संशोधन (सिनियर सिटिझन मेडिकल ट्रीटमेंट, रिहॅबिलिटेशन, रिसर्च) केंद्राचे लोकार्पण पालकमंत्री रवींद्र चव्हाण यांच्या हस्ते ८ ऑगस्ट, दु. ३ वाजता, मालवण येथील संस्थेच्या नूतन वास्तूमध्ये होणार आहे.

सन २०११ साली रेडकर हॉस्पिटल रिसर्च सेंटर या संस्थेने कुडाळ, नेरूर येथे ज्येष्ठ नागरिकांसाठी 'आजोळ' हा वृद्धापकाळात त्यांची वैद्यकीय काळजी सेवा देणारा उपक्रम सुरू केला होता. सिंधुदुर्ग जिल्ह्यात वृद्धांचे वास्तव्य जास्त असून यांचा मृत्यू दरही इतर जिल्ह्यापेक्षा जास्त आहे. अंथरुणाला खिळलेले रुग्ण ज्यांची काळजी पेशंटचे जे नातेवाईक घरी घेऊ शकत नाहीत, अशा लोकांसाठी देखील रेडी येथे



हॉस्पिटल संस्थेने ट्रस्ट चालू केला आहे. ज्यामध्ये 'दिलासा' आणि 'विसावा'असे दोन पूर्णपणे ज्येष्ठ नागरिकांना समर्पित उपचार कक्ष कार्यरत आहेत.

सध्या जिल्ह्यात वृद्धाश्रम आहेत, पण ज्येष्ठांना उपचार देणारे कुठलेही जिर्याट्रिक मेडिकल सेंटर आपल्या जिल्ह्यात, रेडी हॉस्पिटल सोडल्यास नाही.

मालवण येथील संस्थेच्या हॉस्पिटलमध्ये नूतन वास्तुमध्ये डॉक्टर रेडकर कुटुंबीय जिल्ह्यातील पहिले अत्याधुनिक जिर्याट्रिक सेंटर (ज्येष्ठ नागरिक वैद्यकीय उपचार केंद्र) सुरू करीत आहेत.

मालवण येथील ज्येष्ठ नागरिक संघटनेचे अध्यक्ष डॉक्टर सुभाष दिघे समारंभाला प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. यावेळी जिल्ह्यातील ज्येष्ठ नागरिकांच्या समस्या बाबत पालकमंत्री यांचे लक्ष वेधले जाणार आहे, अशी माहिती रेडकर हॉस्पिटल रिसर्च सेंटर ट्रस्टचे अध्यक्ष डॉ. विवेक रेडकर तसेच रेडकर हॉस्पिटल रिसर्च सेंटर ट्रस्टचे विश्वस्त रविकिरण तोरसकर यांच्या वतीने देण्यात आली आहे.

# आ .वैभव नाईकांनी निष्ठा यात्रा काढण्यापेक्षा दहा वर्षातील विकासकामांची यात्रा काढावी

## भाजपचे बाळा पावसकर यांचे आव्हान

**कुडाळ (प्रतिनिधी)**



आमदार वैभव नाईक यांनी निष्ठा यात्रा काढण्यापेक्षा गेल्या दहा वर्षात कोणत्या प्रकारचा विकास केला त्याची विकास यात्रा काढावी असे आव्हान भाजपचे कार्यकर्ते बाळा पावसकर यांनी दिले आहे. नेरुर विभागात शिवसेनेच्या पडत्या काळात बाळासाहेब ठाकरे यांच्या निष्ठावंत शिवसैनिकांना त्रास देत शिवसेनेच्या पोलिंग बूथवर लाथ मारुन बुथ उजळुन लावण्याचा प्रयत्न करणाऱ्यांना सोबत घेऊन आपल्या स्वार्थाची निष्ठा यात्रा काढणाऱ्या आमदारांनी गेल्या दहा वर्षात आपण नेमका या नेरुर जिल्हा परिषद विभागाचा नेमका काय विकास केला हे जनसामान्यांना सांगण्यासाठी विकासाची संकल्प यात्रा काढली असती तर आज या भागातील जनता आपल्या सोबत राहिली असती.

केली दहा वर्षे सामान्य जनतेला विकास कामांच्या माध्यमातून न्याय देण्यास आमदार वैभव नाईक असमर्थ ठरले म्हणूनच येथील जनतेने लोकसभा निवडणुकीत भारतीय जनता पक्षाचे नेते निलेश राणे यांच्यावर विश्वास दाखवलेला आहे. यापुढे कितीही स्वतःच्या स्वार्थासाठी निष्ठा यात्रा काढून आमच्या गावातील लोकांना फसवी आश्वासने देऊन काहीच उपयोग होणार नाही. कारण या वेळेस नेरुर विभागातील जनतेने विकासासाठी आमचे नेते निलेश राणे यांच्या पाठीशी ठामपणे उभे राहण्याचे ठरवले आहे, असेही भाजपचे कार्यकर्ते बाळा पावसकर यांनी म्हटले आहे

# जोरदार वाऱ्यामुळे मासेमारी नौका खडकांवर आदळल्याने दुर्घटना

## सर्जेकोट समुद्रातील घटना : चारही खलाशी बचावले : नौकेचे लाखोंचे नुकसान

**मालवण (प्रतिनिधी)**



सर्जेकोट समुद्रात मंगळवारी मासेमारीस गेलेली नौका जोरदार वाऱ्यामुळे खडकांवर आदळल्याने दुर्घटना घडली. सुदैवाने चारही खलाशी सुखरूपपणे किनाऱ्यावर पोहचले. दरम्यान, राजेश कमलाकर शेलटकर यांच्या मालकीच्या या मच्छीमार नौकेचे सुमारे आठ लाख रूपयांचे नुकसान झाले आहे.

स्थानिकांनी मच्छीमार नौका वाचविण्यासाठी प्रयत्न केले. मात्र वाऱ्यामुळे नौका खडकांवर आदळून समुद्रात बुडाली. यात इंजिन, जाळी व इतर साहित्यही वाहून गेले आहे.

राजेश शेलटकर हे आपल्या खलाशांसह मासेमारीसाठी सर्जेकोट समुद्रात गेले होते. सोसाट्यांच्या वाऱ्यामुळे मासेमारी नौका बांदा परिसरातील खडकाळ भागाकडे ढकलली गेली. त्यांनी आणि खलाशी यांनी नौका वाचविण्यासाठी शर्थीचे प्रयत्न केले, मात्र नौका वाऱ्याच्या वेगाने खडकाळ भागांमध्ये जात आदळून फुटली. नौकेमध्ये पाणी शिरू लागल्याने खलाशांनी तात्काळ समुद्रात उड्या घेत, सुखरूपपणे किनारा गाठला. मात्र नौका पूर्णपणे फुटून गेली. यात नौकेवरील सर्व जाळी आणि इतरही साहित्य समुद्रात वाहून गेले. यात राजेश शेलटकर यांचे मोठे नुकसान झाले आहे.

मासेमारी बंदी कालावधीनंतर नवीन हंगामाच्या सुरूवातीलाच मोठी दुर्घटना घडल्याने राजेश शेलटकर यांना मोठा फटका बसला आहे. स्थानिक मच्छीमारांना प्रयत्न करूनही नौका वाचविण्यात यश मिळाले नाही. स्थानिकांना माहिती मिळताच त्यांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. मात्र पूर्णपणे खडकाळ भागात नौका अडकून पडली होती. त्यात मोठ्या प्रमाणात समुद्राचे पाणी घुसल्याने नौकेला जलसमाधी मिळाली. खासदार नारायण राणे यांची भेट घेवून तातडीने दिशादर्शक दीप बसविण्यासाठी लक्ष वेधण्यात येणार असल्याचे नितीन परूळेकर यांनी सांगितले.

# सुमंत कुबल यांचे निधन



**आचरा :**

आचरा पिरावाडी शंकरवाडी येथील रहिवासी चक्की व्यावसायिक सुमंत कृष्णा कुबल (वय-७६) यांचे ६ ऑगस्ट रोजी मुंबई येथे दुःखद निधन झाले. ते सर्वत्र वैद्य म्हणून व दत्त भक्त म्हणून सुपरिचीत होते. त्यांची भाताची आणि पिठाची गिरण होती.

त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुलगे, सुना, दोन मुली, जावई, नातवंडे, पुतणे, पुतण्या, नातेवाईक असा मोठा परिवार आहे.

# मळगाव घाटीत एस.टी. बसला लक्झरी बसची धडक

## एसटीतील काही प्रवासी किरकोळ जखमी

**सावंतवाडी (प्रतिनिधी)**




सावंतवाडी -रेडी राज्य मार्गावरील मळगाव घाटीत सावंतवाडीच्या दिशेने जाणाऱ्या एसटी बसला घाटीतून खाली येणाऱ्या लक्झरी बसने समोरासमोर धडक दिली. या अपघातात एसटीतील काही प्रवासी किरकोळ जखमी झाले.मात्र, सुदैवाने एसटी बस दरीलगत असलेल्या रेलिंग लगत थांबल्याने मोठा अनर्थ ठळला. विशेष म्हणजे या गाडीत सावंतवाडीत महाविद्यालयात जाणारे अनेक विद्यार्थी होते. अपघातानंतर मळगावच्या दिशेने आलेल्या बसला तेथेच थांबवण्यात आले. एसटी प्रशासनाकडून सावंतवाडी पोलिसात दिलेल्या तक्रारीनुसार अपघाताची नोंद करण्यात आली आहे.

# वैभववाडीत रक्तदान शिबिर : ३८ जणांनी केले रक्तदान

## शहीद मेजर कौस्तुभ रावराणे यांच्या स्मृतिदिनानिमित्त शिबिराचे आयोजन



**वैभववाडी (प्रतिनिधी)**

वैभववाडीचे सुपुत्र शहीद मेजर कौस्तुभ रावराणे यांच्या सहाव्या स्मृतिदिनानिमित्त वैभववाडी येथील महाराणा प्रतापसिंह शिक्षण संस्था मुंबई संचलित आनंदीबाई रावराणे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात रक्तदान शिबिर संपन्न झाले. आनंदीबाई रावराणे महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभाग, सिंधु रक्तमित्र प्रतिष्ठान, वैभववाडी पोलीस ठाणे व जीवनधारा रक्तपेढी, कोल्हापूर यांच्या संयुक्त विद्यमाने रक्तदान शिबिराचे आयोजित करण्यात आले होते. सदर शिबीर हे वैभववाडीचे सुपुत्र शहीद मेजर कौस्तुभ रावराणे यांच्या ६ व्या स्मृतिदिनानिमित्त आयोजीत करण्यात आले. सदर शिबिरामध्ये एकूण ३८ रक्तदात्यांनी रक्तदान केले. या शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी मनोगत व्यक्त करताना जीवनधारा रक्तपेढी, कोल्हापूरचे डॉ.नयनिश मोरे यांनी रक्तदानाचे महत्व व गरज समजावून सांगताना समाजातील प्रत्येक नागरिकाने रक्तदान करावे असे आवाहन केले.

सदर शिबिराच्या उद्धघाटनप्रसंगी महाराणा प्रतापसिंह शिक्षण संस्थेच्या स्थानिक समितीचे अध्यक्ष सज्जनकाका रावराणे, स्थानिक समितीचे सचिव प्रमोद रावराणे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सी. एस. काकडे, प्रकाश कुमार रावराणे, विजय रावराणे, वैभववाडी पोलीस निरीक्षक सुनील अवसरमोल, जीवनधारा ब्लड सेंटर कोल्हापूर डॉ.नयनीश मोरे, सिंधुरक्त मित्र प्रतिष्ठान वैभववाडी अध्यक्ष राजेश पडवळ हे मान्यवर उपस्थित होते.

या शिबिराचे आयोजन महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना, राष्ट्रीय छात्र सेना, आजीवन अध्ययन व विस्तार विभाग आणि सांस्कृतिक विभागाच्यावतीने करण्यात आले होते.

# कणकवली - बोरीवली व्हाया वैभववाडी एसटी सेवा सुरू

## ● आमदार नितेश राणे यांच्या दणक्यानंतर प्रशासन खडबडून झाले जागे

## ● प्रवासी व नागरिकांमधून समाधान व्यक्त

**वैभववाडी (प्रतिनिधी)**



आमदार नितेश राणे यांच्या सूचनेनंतर कणकवली - बोरीवली व्हाया फोंडा, वैभववाडी फेरी गुरूवारपासून चालू होणार आहे. अनेक वर्षांनंतर वैभववाडीतून मुंबई, बोरीवली ही एसटी सुरू होत असल्याने प्रवाशांत समाधान व्यक्त होत आहे.

वैभववाडी बसस्थानकातील प्रलंबित प्रश्न व समस्या याबाबत सोमवारी आमदार नितेश राणे यांची अधिकाऱ्यांसोबत बैठक पार पडली. यावेळी आमदार राणे यांनी विभाग नियंत्रक अभिजीत पाटील यांना खडे बोल सुनावले होते. वैभववाडी - मुंबई, बोरीवली फेरी चालू करा, दोन वाहतूक नियंत्रक यांची नियुक्ती तात्काळ करा, मानव विकास गाड्या सुरू करा, प्रवाशांना बसण्यासाठी पुरेशी जागा उपलब्ध करा, अशा विविध मागण्या भाजपा जिल्हा उपाध्यक्ष प्रमोद रावराणे व पदाधिकाऱ्यांनी मांडल्या होत्या. मागण्या तात्काळ पूर्ण करा व प्रवाशांची गैरसोय होणार नाही याची काळजी घ्या, अशा सूचना आमदार राणे यांनी पाटील यांना केल्या होत्या. आमदार नितेश राणे यांच्या उपस्थितीत पार पडलेल्या बैठकीनंतर राज्य परिवहन मंडळ सिंधुदुर्ग खडबडून जागे झाले आहे. अनेक वर्ष प्रवाशांच्या प्रतीक्षेत असलेली वैभववाडी - बोरीवली एसटी आता धावणार आहे. ही गाडी कणकवली वरून सुटेल, फोंडा, वैभववाडी, तरेळे या मार्गावरुन धावणार आहे. ८ ऑगस्टपासून ही गाडी सुरू करण्यात येणार आहे. या गाडीमध्ये वैभववाडी व फोंडा या बस स्थानकाकरिता काही सीट कोटा राखून ठेवण्यात येणार आहे. सदर फेरी संगणकीय आरक्षणास उपलब्ध करून देण्यात येत आहे. अशी माहिती विभाग नियंत्रक, राज्य परिवहन सिंधुदुर्ग विभाग कणकवली यांच्याकडून देण्यात आली आहे.

# वैभववाडी तालुका ठेकेदार संघटनेच्या अध्यक्षपदी दिलीप रावराणे यांची निवड

## सचिवपदी रमेश शेळके, खजिनदारपदी संजय सावंत यांची निवड

**वैभववाडी (प्रतिनिधी)**



दिलीप रावराणे | रमेश शेळके | संजय सावंत

वैभववाडी तालुका ठेकेदार संघटनेच्या अध्यक्षपदी जिल्हा बँक संचालक दिलीप रावराणे यांची एकमताने निवड करण्यात आली आहे. तर सचिवपदी रमेश शेळके, खजिनदारपदी संजय सावंत यांची निवड करण्यात आली आहे. नूतन पदाधिकारी यांचे सर्वांनी अभिनंदन केले. वैभववाडी तालुका ठेकेदार संघटनेची बैठक नुकतीच पार पडली. यावेळी नूतन कार्यकारिणी गठीत करण्यात आली आहे.

वैभववाडी तालुक्यात जवळपास ५५ ठेकेदार कार्यरत आहेत. त्यामध्ये शासकीय ठेकेदार, ठेकेदार, मजूर संस्था ठेकेदार व सुशिक्षित बेरोजगार अभियंता यांचा समावेश आहे. कार्यकारिणीच्या बैठकीत विविध विषयावर चर्चा करण्यात आली. जिल्हा बॅक संचालक दिलीप रावराणे यांची सर्वांनी एकमताने संघटनेच्या अध्यक्षपदी निवड केली आहे.

यावेळी वैभववाडी भाजपा मंडळ अध्यक्ष नासीर काझी, भाजपा उपाध्यक्ष भालचंद्र साठे, माजी वित्त व बांधकाम सभापती जयेंद्र रावराणे, सज्जनकाका रावराणे, राजेंद्र राणे, सुधीर नकाशे, देवानंद पालांडे, बंड्या मांजरेकर, सुधाकर साळुंखे, हुसेन लांजेकर, सुनील रावराणे, संजय चव्हाण, प्रकाश पाटील, समाधान साळुंखे, विवेक रावराणे व युवा ठेकेदार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# साहित्य वाटपाने शैक्षणिक मूल्य संवर्धित!

## ऋणानुबंध सिमा ओस्तवालांचे कार्य कौतूकास्पद

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

आजचा विद्यार्थी उद्याच्या भारताचे उज्वल भविष्य असतो. त्यामुळे त्याच्या जडणघडीत, प्रत्येक व्यक्तीने जमेल तसे योगदान दिले पाहिजे. कारण हाच माणूसकीचा खरा धर्म असतो.असे विचार मनामनात रुजवित सिमा ओस्तवाल, ह्या समाज कार्याचा गाडा नेटाने पुढे नेत आहेत. त्यांच्या संकल्पनेतून आज विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप होत असून ही बाब कौतूकास्पद आहे. त्यामुळे शैक्षणिक मूल्य संवर्धित, झाले आहेत! असे उदगार उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केले.

बीड जिल्ह्यातील शहाजानपुर,अनकोटा, लोळदगाव,गायरान वस्ती येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत, गुरु आनंद महिला प्रतिष्ठान बीड आयोजित प्रयास फाउंडेशन, मुंबई यांच्या सहकार्याने विद्यार्थांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष शालय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष अनिल जेठे, प्रमुख पाहुणे म्हणून माजी सभापती तुकाराम हराळे, सरपंच संदिप सोलनकर, शहाजानपुर शाळेचे मुख्याध्यापक बाबासाहेब ओव्हाळ, तसेच गावातील नागरिक उपस्थित होते.



बीड : विद्यार्थांना शैक्षणिक साहित्य वाटप करताना सिमा ओस्तवाल आदी.

### माणुसकीचा हात सरसावला

गुरु आनंद महिला प्रतिष्ठान संस्थेस मदतीचा हात देण्यात आला.त्यामध्ये तुकाराम हराळे ५ हजार, प्रा.शा.शहाजानपुर १ हजार, दिली.प्रा.शा.अनकोटा पाचशे रुपये, शितल यमगर १ हजार, मिरा सोलनकर पाचशे रुपये, शितल सोलनकर चारशे रुपये, मनोहर सोलनकर पाचशे रुपये अशी देणगी गुरु आनंद महिला प्रतिष्ठानला देऊन सन्मान करण्यात आला.

यावेळी बोलतांना मान्यवर म्हणाले की, समाजात चांगल्या माणसांची कमतरता नाही. त्यापैकीच सिमा ओस्तवाल आहेत. जीवन जगत असतांना ते कसे जगले पाहिजे याला फार महत्व नाही, मात्र आपण किती लोकांच्या कामी आलो, त्याला अधिक महत्वाचे आहे. हा शैक्षणिक साहित्य वाटपाचा उपक्रम, विद्यार्थांनाही प्रेरणा देईल असाच आहे. कारण या साहित्य वाटपातून उद्याचे स्वप्न साकार होण्यास मदत होणार आहे. एवढेच नव्हे तर विद्यार्थ्यांनाही शिक्षणाचे महत्व पून्हा एखादा नव्याने कळणार आहे. असे म्हणत मान्यवरांनी सिमा ओस्तवाल यांच्या

पान २ वर...

# शुक्रवारी 'घरो घरी तिरंगा'

## धोरण : उपक्रमातंर्गत तिरंगा रॅलीचे आयोजन




बीड/ पुण्यभूमी प्रतिनिधी

बीड, ८: स्वातंत्र्य दिनाच्या पार्श्वभूमीवर मागील काही वर्षांपासून घरो घरी तिरंगा हा उपक्रम राबविण्यात येत आहे. यातंर्गत उद्या शुक्रवारी तिरंगा रॅली चे आयोजन छत्रपती संभाजी महाराज क्रिडांगण येथुन करण्यात येत आहे.

राज्यभर घरोघरी तिरंगा उपक्रम राबविण्यात येत असून या अतंर्गत बीडमध्ये शुक्रवारी सकाळी १०:३० वाजता छत्रपती संभाजी महाराज क्रिडांगण येथुन या उपक्रमाचा शुभारंभ होणार असून ही रॅली पुढे कारंजा-भाजीमंडई मार्ग-छत्रपती शिवाजी महाराज क्रीडा संकुल यामार्गास जाणार आहे.

घरो घरी तिरंगा या उपक्रमाअंतर्गत तिरंगा रॅली , तिरंगा मॅरेथॉन, तिरंगा सांस्कृतिक कार्यक्रम, तिरंगा कॅनव्हास, तिरंगा प्रतिज्ञा, तिरंगा सेल्फी, तिरंगा सेल्फीज, तिरंगा ट्रिब्युट, तिरंगा मेळा असे उपक्रम राबविण्यात येणार आहे. या तिरंगा रॅलीमध्ये बीडच्या नागरीकांनी सहभाग नोंदवावा असे आवाहन जिल्हा प्रशासनाने किया केले आहे.

# परळी तहसील कार्यालयावर निदर्शन

## निवेदन : पिक कर्ज मागणीसाठी किसान सभा आक्रमक

परळी/पुण्यभूमी प्रतिनिधी

शेतकऱ्यांना नवीन पीक कर्ज मिळावे, शेतकऱ्यांच्या बँक खात्यावर लावलेले होल्ड काढावेत, वाण धरणावरील वीज पंपाची तोडलेली वीज तात्काळ जोडून द्यावी, मागच्या वर्षीचा पिक विमा शेतकऱ्यांच्या खात्यात तात्काळ जमा करावा व शेतकऱ्यांना सरसकट कर्जमाफी देण्यात यावी. या मागण्यांसाठी महाराष्ट्र राज्य किसान सभेच्या वतीने गुरुवार दि ८ रोजी परळी तहसील कार्यालयावर शेतकऱ्यांनी निदर्शने केली. या आंदोलनाचे नेतृत्व किसान सभेचे जिल्हा अध्यक्ष कॉ.एड. अजय बुरांडे यांनी केले.

राज्य व केंद्र सरकार शेतकऱ्यांना विविध योजनेतुन फायदा देत असल्याच्या जाहिराती वर करोडोचा खर्च करीत असताना राष्ट्रीयकृत बँका शेतकऱ्यांना त्रास देत आहेत. शेतकऱ्यांना वेगवेगळ्या मार्गाने अडवणुक करण्याचे काम बँक प्रशासन करीत आहेत. यापुढे बँकानी शेतकऱ्यांची अडवणुक केल्यास संबंधित बँकाच्या विरोधात आंदोलन करण्याचा इशारा कॉ अजय बुरांडे यांनी दिला आहे.याप्रसंगी किसान सभेचे जिल्हा सचिव कॉ. मुरलीधर नागरगोजे, कॉ सुदाम शिंदे, कॉ भगवान बडे, कॉ मुक्तेश्वर कडभाने, धनंजय सोळंके, कॉ मनोज देशमुख,



पान २ वर...

# भुयारी गटार योजना चौकशीसाठी उपोषण

## संतप्त :रानबा गायकवाडांनी उचलले पाऊल!

परळी/पुण्यभूमी प्रतिनिधी परळी शहरात राज्य शासनाच्या सुवर्ण जयंती नगरोत्थान योजनेअंतर्गत ११० कोटी रुपयांच्या भुयारी गटार योजनेचे काम अत्यंत निकृष्ट दर्जाचे व टेंडर नुसार आणि दिलेला कालावधी लोटल्यानंतरही अद्यापही काम चालू आहे. या कामाची चौकशी करून संबंधित एजन्सीला काळ्या यादीत टाकावे दिरंगाई बद्दल दिलेला दंड वसूल करावा या मागणीसाठी पत्रकार रानबा गायकवाड यांचे दिनांक १२ ऑगस्ट पासून परळी नगर परिषद कार्यालयासमोर आमरण उपोषण करण्यात येणार आहे.

याबाबत प्रसिद्ध दिलेल्या पत्रकात म्हटले आहे की , सुवर्ण जयंती नगरोत्थान योजनेअंतर्गत ११० कोटी रुपयांच्या भुयारी गटारी व रस्त्याचे काम लातूर येथील श्रीनाथ इंजिनिअरिंग यांना देण्यात आले होते. १६ सप्टेंबर २०१९ मध्ये या योजनेचे काम परळी शहरात सुरू करण्यात आले. या योजनेअंतर्गत शहरात भुयारी गटारी, अंडरग्राउंड नाल्या, ड्रेनेज सिव्हरेज लाईन, रस्ते व फुटपाथपाचे काम आदींचा समावेश आहे.



शहरातील २५००० घरांचे सांडपाणी या योजनेअंतर्गत ड्रेनेज लाईन द्वारा शहराबाहेरील टाक्या पर्यंत नेण्यात येणार आहे .या योजनेचे जे चेंबर बांधले आहेत त्या चेंबरला शहरातील एकही घराच्या नालीचे

पान २ वर...

# केजमधील अवैध धंद्यांचा बंदोबस्त करा!

## आक्रमक : ठाकरे शिवसेनेकडून अमर उपोषण सुरु

केज/पुण्यभूमी प्रतिनिधी

केज पोलीस स्टेशन व युसुफवडगाव पोलीस स्टेशन हद्दीतील अवैध धंद्याचे जाळे फोफावत चालले आहे.गुटखा-मटका ,अवैध गो-वाहतुक,अवैध दारू विक्री, अवैध वाळु उपसा,अवैध चंदन तस्करी,अवैध ऑनलाईन गेम, अवैध गांज्या विक्री व अनेक अवैध धंद्यामुळे कित्येकांना आपला जिव गमवावा तर लागतोच या व्यसनांमुळे कित्येकांची घरे उद्वस्त झाली आहेत.

अशा व्यसनापायी अनेक जन बेघर होऊन देशोधडीला वाहुन चुकीच्या मार्गाकडे लागत आहेत, अनेक युवक अश्या व्यसनांच्या नादी लागल्याने गुन्हेगारीच्या कुठल्याही थराला जात आहेत , गुन्हेगारी वाढण्यासाठी कारणीभुत ठरणाऱ्या अवैध दारू विक्री,गुटखा,मटका अशा प्रकारच्या अवैध धंद्यावर पोलीसप्रशासणाच्या दुर्लक्षणामुळे फोफावत चाललेला हा केज पोलीस स्टेशन व युसुफवडगाव पोलीस स्टेशन हद्दीतील अवैध धंद्याचा सुळसुळाट ८ दिवसात बंद करण्याच यावा, असा इशारा देण्यात आला परंतु प्रशासनाला काही फरक पडला नाही म्हणून दि. ०८/०८/२०२४ रोजी तहसील कार्यालय केज या ठिकाणी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने आमरण उपोषण शिवसेना तालुकाप्रमुख अशोक जाधव, किशोर घुले , तात्या रोडे, ज्ञानेश्वर बोबडे, वैजनाथ वाघमारे, असे उपोषणकर्ते आहेत हे आज अमरण उपोषणाला बसले आहेत तरी प्रशानने उपोषणाची दखल घ्यावी अशी मागणी करण्यात येत आहे.






# डॉ.अनिलकुमार साळवेंना मातृशोक

माजलगाव/पुण्यभूमी प्रतिनिधी

सिने-नाटय लेखक-दिग्दर्शक प्रा.डॉ. अनिलकुमार साळवे यांच्या मातोश्री केशरबाई उत्तमराव साळवे यांचे गुरुवार दि.८ रोजी निधन झाले. मृत्यू समयी त्यांचे वय ६५ वर्ष होते. मायाळू स्वभावाची महिला म्हणून त्या परिसरात परिचित होत्या. माजलगाव नगर परिषदेचे माजी बांधकाम सभापती राजेश साळवे यांच्या त्या काकू होत्या. त्यांच्या पश्चात दोन मुले, दोन मुली, सुना, जावई, नातवंडे असा मोठा परिवार आहे.

# सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याची मागणी

## जयाताई राऊत : पोलीस प्रशासनास दिले निवेदन

केज/पुण्यभूमी प्रतिनिधी

केज शहरात दिवसेंदिवस चोरट्यांचे गोष्टी ऐकु येत असल्याने नागरिक भयभीत झाले आहेत. त्यासाठी शहरातील चौकाचौकात सि.सी.टीव्ही कॅमेरे बसविण्याची मागणी शिवसेना महिला आघाडीच्या तालुकाप्रमुख जयाताई राऊत यांनी पोलीस निरीक्षक यांना निवेदनाद्वारे केली आहे.शहरात ग्रामीण भागातील मुली,बाजाराच्या निमित्ताने महिला पुरूष येतात.रात्री परत जाण्यास उशीर झाला तर चोरांची भिती वाटते.अनेक ठिकाणी लुटमारीचे प्रकार घडल्याच्या बातम्या कानी आल्याने नागरिकांमध्ये भितीचे वातावरण निर्माण झाले आहे. तसेच शाळा, महाविद्यालय, क्लासेस या ठिकाणी टवाळखोर पोरं वेगवान गाड्या वरून मुलींना त्रास देतात.मुली असुरक्षित असल्याची भावना निर्माण झाल्याने शहरातील चौकाचौकात अशी कॅमेरे बसविल्याने अशा प्रकारांवर आळा बसेल.गुन्हेगारांना तात्चोकाळ चोप मिळेल करिता तात्काळ कार्यवाही करावी अशा मागणीचे निवेदन जिल्हाप्रमुख अनिल दादा जगताप, सचिन भैय्या मुळुक, महिला आघाडीच्या जिल्हाप्रमुख चंद्रकलाताई बांगर यांच्या मार्गदर्शनाखाली तालुकाप्रमुख जयाताई राऊत यांनी दिले आहे.



## रोहन गलांडे विहीरी,गायगोठा रक्कम जमा करा

# अन्यथा केज पंचायतसमोर आत्मदहन

केज/पुण्यभूमी प्रतीनिधी

केज तालुक्यातील प्रेत्येक ग्रामपंचायत अंतर्गत महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना म्हणजेच मनरेगाच्या माध्यमातून खोदलेल्या शेतकऱ्यांचे वयक्तीक लाभार्थ्यांचे सिंचन विहीर खोदण्यासाठीचे ४ लाख रुपये अनुदान व गायगोटा योजनेचे ७८ हजार अशा दोन्ही योजनेचे शासनाकडून निधी मागवून लवकरात लवकर लाभार्थी यांना रक्कम मिळावी व तात्काळ शासनाने द्यावी जर तात्काळ रक्कम देण्यात आली नाही तर केज पंचायत समिती समोर आत्मदहन करणार आहे असा इशारा शासनाला निवेदनाद्वारे अखिल भारतीय कुणबी मराठा महासंघ महाराष्ट्र राज्य केज तालुकाध्यक्ष रोहन गलांडे पाटील यांनी दीला आहे या विषयी निवेदनाद्वारे सविस्तर वृत्त असे की महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना म्हणजेच मनरेगाच्या माध्यमातून केज तालुक्यातील लाभार्थी शेतकऱ्यांचे वयक्तीक लाभार्थ्यांचे शासन कागदोपत्री प्रक्रिया ज्या लाभार्थांची पुर्ण झाली आहे व केज तालुक्यातील ग्रामपंचायत अंतर्गत ज्या लाभार्थ्यांनी मनरेगा जलसिंचन विहीर योजनेचे लाभार्थी आहेत लाभार्थांन कडील शासन प्रक्रिया पूर्ण झालेली आहे परंतु अद्याप पर्यंत लाभार्थ्यांना मनरेगा योजने अंतर्गत झालेल्या विहीरीचा ऐकही रुपये रक्कम देण्यात आलेली नाही चार - पाच महिने झाले केज तालुक्यातील विहीर लाभार्थी शेतकरी मनरेगा विहीर योजने अंतर्गत ४ लाख अनुदान मिळणार म्हणून व्याजाचे पैसे काढून विहीरीला खर्च करून विहीर खोदल्या आहेत परंतु शासना कडुन महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत खोदलेल्या विहीरीची ४ लाख रुपये रक्कमेतील ऐक रुपये शेतकऱ्यांच्या , लाभार्थ्यांच्या खात्यात जमा करण्यात आलेला नाही तरी शासनाने केज तालुक्यातील




> जलसिंचन विहीर लाभार्थी यांची बीले पास होऊन दोन महीने झाले आहेत तरी शासनाकडून निधी आलेला नाही.
>
> -अनिल घोडके, सचिव,ग्राम रोजगार सेवक संघटना केज

पान २ वर...

# सचिन अन् नितीन शोलेतले जय विरु

## सुजय विखे-पाटील : वाढदिवसास मित्र परिवाराची मांदियाळी

शिर्डी/पुण्यभूमी प्रतिनिधी राजवाडा प्रतिष्ठानचे सचिन गायकवाड व नितीन धिवर यांची दोस्ती ही शोले तील जय आणि वीरु यांच्या सारखीच असल्याचे प्रतिपादन युवा नेते मा खासदार सुजय दादा विखे-पाटील यांनी केले

राजवाडा प्रतिष्ठानचे सचिन भाऊ गायकवाड यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित अभिष्टचिंतन कार्यक्रमात ते बोलत होते शिर्डी येथील राजवाडा प्रतिष्ठानचे सर्वेसर्वा सामाजिक कार्यकर्ते सचीन भाऊ गायकवाड यांच्या वाढदिवसानिमित्त अभिष्टचिंतन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते या वेळी व्यासपीठावर प्रथम लोकनियुक्त नगराध्यक्ष कैलासबापु कोते यांच्या सह सामाजिक राजकीय धार्मिक क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते



सुजय दादा विखे-पाटील यांनी यावेळी सचिन गायकवाड यांच्या कार्याचा गौरव केला कामासाठी माझ्या कडे आपल्या कुटुंबालातील आपुलकीच्या नात्याने या कुठल्याही मध्यस्थीची गरज नाही मित्रत्वाच्या भावाचा नात्याने काम येऊन या आपले काम नक्कीच मार्गी लावले जाईल. सचिन गायकवाड, नितीन धिवर, नितीन शेजवळ तुमच्या वर शिर्डीची फार मोठी जबाबदारी आहे सचिन गायकवाड व नितीन धिवर यांची मैत्री ही शोले तील जय आणि वीरु यांच्या सारखीच असल्याचे गौरवोद्गार त्यांनी काढले वाढदिवसाच्या

पान २ वर...